रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ३५७
www.ramprahar.com
सोमवार, १५ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
खातेदारांना फसवणाऱ्या 'बबली'विरुद्ध गुन्हा/२
आज जागतिक युवा कौशल्य दिन/४
वर्ल्ड लीजेंड्स लीगमध्ये भारतीय संघ 'चॅम्पियन'/८

## सरकारकडून मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची स्थापना



**मुंबई** : महाराष्ट्र सरकारकडून मुख्यमंत्री वारकरी महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे असेल. या महामंडळावर कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवतील अधिकारीची व्यवस्थापकिय संचालकपदी नियुक्ती करण्यात येणार आहे तसेच महामंडळासाठी ५० कोटींची तरतूद शासनाकडून करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या ११ जुलै रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारकडून याबाबत रविवारी (दि. १४) अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरचा दौरा केला. त्यांनी आषाढी यात्रेच्या नियोजनाची पाहणी करून प्रशासनास सूचना दिल्या. या वेळी मुख्यमंत्री पालखी सोहळ्यात काही अंतर पायी चालले.

# रायगडात मुसळधार पर्जन्यवृष्टी

## नागोठणे, खोपोलीत पाणी शिरले; अनेक ठिकाणी वाहतुकीवरही परिणाम

**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील नागोठणे, खोपोलीसह अन्य ठिकाणी पाणी शिरले. अनेक भागांमध्ये रस्त्यांवर पाणी आल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला. रविवारी (दि. १४) दिवसभरदेखील जोरदार सरी बरसत होत्या. त्यामुळे जिकडेतिकडे पाणी साचल्याचे दिसून आले.

गेल्या आठवडाभर पडत असलेल्या संततधार पावसाचा वेग पुन्हा एकदा शनिवारी वाढला. रात्रीदेखील जोरदार पाऊस पडला आणि त्याचा जोर रविवारी कायम होता. त्यामुळे नागोठणे येथील अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आणि हे पाणी शहरातील एसटी व रिक्षा स्टॅण्ड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ, कोळीवाडा, वन विभाग परिसरात शिरून पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे महसूल खाते, ग्रामपंचायत व पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला. दरम्यान, बाजारपेठेत पूरस्थिती निर्माण झाल्यामुळे आपले सामान सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी व्यापारीवर्गाची उडाल्याचे दिसून आले.

खालापूर तालुक्यासह खोपोली शहरात जोरदार पावसामुळे अनेक सखल भागांत पाणीच पाणी झाले. अडकलेल्या नागरिकांना बचावपथकांनी बाहेर काढले. त्याचप्रमाणे पाताळगंगा नदीला पूर आल्याने शेजारील गावांना, वाड्या-वस्त्यांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.



पाताळगंगा नदीवर असणाऱ्या खालापूर-सावरोली मार्गावरील पूल पाण्याखाली गेला. त्यामुळे तेथील वाहतूक बंद करण्यात आली होती. त्याचप्रमाणे चौक-कर्जत मार्गावरील वावर्ले गावच्या हद्दीत पाणी साठल्याने हा मार्ग काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. खालापूरमधील मिळगाव पूलही पाण्याखाली गेल्याने पलीकडील गावांचा संपर्क तुटला होता. याशिवाय खोपोली-पाली मार्गावर पाणी येऊन वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला.

अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने वाकण-पाली राज्य महामार्गावर पाली अंबा नदीपुलाजवळ रस्त्यावर पाणी आले. त्यामुळे सकाळपासून येथील वाहतूक तब्बल सहा तास ठप्प होती. परिणामी दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या. याच मार्गावर बलाप गावाजवळही रस्त्यावर पाणी साचल्याने तेथेही वाहतूक खोळंबली होती. दुपारी पाणी ओसरल्यावर वाहतूक पूर्ववत झाली.

माणगाव तालुक्यात इंदापूर-पाणसई मार्गावर पाणी जमा झाले. त्यामुळे सात ते आठ गावांचा संपर्क तुटला होता. रोह्यातील कुंडलिका नदी तुडुंब भरून वाहत असल्याने रोहा-अष्टमीला जोडणारा जुना पूल पाण्याखाली गेला होता. (पान २ वर..)

### तालुकानिहाय पडलेला पाऊस (मिलीमीटरमध्ये)

**पेण** १९७.९, **अलिबाग** १७३.१, **खालापूर** १६६.३, **पनवेल** १५२.६, **मुरुड** १२१.८, **सुधागड** १५०.७. **कर्जत** १४२.६, **रोहा** १२५.१, **महाड** १३१.४, **पोलादपूर** १०६.९, **म्हसळा** १०६.४, **माणगाव** १०५.३, **श्रीवर्धन** ८२.४ , **तळा** ११६.७, **उरण** ८६, **सरासरी १३७.५.**

### एक्स्प्रेस वेवर पाणी

जोरदार पावसामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटातील अमृतांजन पुलाजवळ पाणी साचले होते. या ठिकाणी गुडघाभर पाण्यातून वाहनचालकांना वाट काढावी लागली, तर जुन्या महामार्गावर खोपोली गुडलक टॉकीज ते हायको कॉर्नरदरम्यान कंबरभर पाणी होते. याच मार्गावर माधवबाग येथे पाणी साठल्याने एसटी बस बंद पडली. पोलिसांनी प्रवाशांना सुखरूप बाहेर काढून दुसऱ्या वाहनातून पुढील प्रवासासाठी मार्गस्थ केले.

### नागरिकांचे स्थलांतर

रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे दोन कच्च्या घरांचे पूर्णतः नुकसान झाले. ७२ पक्क्या घरांचे अंशतः नुकसान झाले. २२ गोठेही बाधित झाले. पोलादपूर तालुक्यातील सहा, तर पेण आणि मुरूड प्रत्येकी एक अशा एकूण आठ गावांमधील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले. यात १०२ कुटुंबांतील ३३६ जणांचा समावेश आहे.

## खेड, भिवंडीत पूर

**रत्नागिरी, भिवंडी : प्रतिनिधी**



अतिवृष्टीमुळे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड आणि ठाणे जिल्ह्यातील भिवंडीत रविवारी (दि. १४) पूर येऊन नागरिकांचे नुकसान झाले. खेडमध्ये सुमारे १००हून अधिक नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे.

खेड तालुक्यात झालेल्या पावसामुळे जगबुडी नदीला पूर आला. नदीचे पाणी शहरात घुसले. त्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले. जगबुडी नदीसोबतच नारंगी नदीलादेखील पूर आला, तर संगमेश्वरमधील गडनदीला पूर येऊन पाणी बाजारपेठेत शिरले. रत्नागिरी जिल्ह्यात गेले चार दिवस मुसळधार पाऊस सुरू असून जिल्ह्यातील बहुतेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली.

मुसळधार पावसाचा फटका भिवंडीलाही बसला. कामवारी नदीला पूर आल्याने शहरासह ग्रामीण भागातदेखील हाहाकार उडाला. खाडीपार परिसरात अनेक घरांमध्ये पाणी शिरले. तीन बत्ती, भाजी मार्केट, ईदगाह रोड परिसरातही पावसाचे पाणी साचले होते.

## मुंबई-गोवा महामार्ग, कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

कोकणात रविवारी (दि. १४) पावसाचा कहर पहायला मिळाला. जोरदार पावसामुळे मुंबई-गोवा महामार्ग पाण्याखाली गेला, तर दुसरीकडे दरड कोसळून कोकण रेल्वेची वाहतूकही ठप्प झाल्याचे दिसून आले.

खेडमध्ये डोंगरावरून येणारे पाणी मुंबई-गोवा महामार्गावर आले. महामार्गावरील बोरघर बसस्टॉप येथे नदीचे पाणी रस्त्यावर आल्याने वाहतूक बंद करण्यात आली तसेच ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली. कोकणात मुसळधार पाऊस पडत असल्याने अनेक रस्ते जलमय झाल्याचे पहायला मिळाले.

अतिवृष्टीचा फटका मुंबई-गोवा महामार्गाबरोबरच कोकण रेल्वेलाही बसला. खेड ते दिवाणखवटी रेल्वेस्थानकांदरम्यान रविवारी सायंकाळी दरड कोसळली. त्यामुळे अनेक रेल्वेगाड्या थांबविण्यात आल्या. या घटनेनंतर मातीचा ढिगारा हटवण्याचे काम हाती घेण्यात आले.

## निवडक

### अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प गोळीबारातून थोडक्यात बचावले

**न्यूयॉर्क** : अमेरिकेचे माजी अध्यक्ष आणि यंदाच्या निवडणुकीतील रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पेन्सल्व्हेनिया येथील प्रचारसभेत बोलताना गोळीबार करण्यात आला. गोळी ट्रम्प यांच्या कानाला चाटून गेली. या हल्ल्यात ते थोडक्यात बचावले. दरम्यान, सिक्रेट सर्व्हिसच्या जवानांनी हल्लेखोराला ठार केले आहे.

### भारतीय यंग ब्रिगेडचा सलग चौथ्या सामन्यात विजय

**हरारे** : पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारतीय संघाने झिम्बाब्वेचा ४२ धावांनी पराभव केला. यासह भारताने मालिका ४-१ने जिंकली. भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सहा गडी गमावून १६७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेला १८.३ षटकांत १० गडी गमावून केवळ १२५ धावाच करता आल्या.

## आरोग्य महाशिबिरासंदर्भात नियोजन बैठकीत चर्चा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेलमधील जनतेसाठी आरोग्य महाशिबिर आयोजित करण्यात आले असून या संदर्भात शनिवारी (दि. १३) खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजन बैठक आयोजित करण्यात होती. या वेळी शिबिरासंदर्भात विचारविनिमय करण्यात आला.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष पनवेल आणि रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी म्हणून पनवेल तालुका व शहरातील गरीब, गरजूंसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिराचे आयोजन ४ ऑगस्टला सीकेटी महाविद्यालयात करण्यात आले आहे. या संदर्भात नियोजन बैठक झाली. (पान २ वर..)



## विद्यार्थ्यांनो, आदर्श नागरिक बना -शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांनी आपले आचरण आदर्शवत ठेवले पाहिजे, कारण त्यांचेच अनुकरण मुले करत असतात व त्यातूनच पिढी घडते. त्याचप्रमाणे जशी सोन्याची परीक्षा अग्नीमध्ये होत असते तसा विद्यार्थी हा समाजातून तावून सुलाखून निघाल्यावर एक आदर्श नागरिक बनू शकतो, असे प्रतिपादन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे यांनी केले. ते विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात बोलत होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेचे श्रद्धास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून (पान २ वर..)

### सीकेटी विद्यालयात गुणगौरव सोहळा



### व्यवहारिक शिक्षणाची कास धरा -लोकनेते रामशेठ ठाकूर

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात, विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकी शिक्षण न घेता व्यवहारिक शिक्षणाची कास धरली पाहिजे. आळस न करता प्रचंड मेहनत व चिकाटीने अभ्यास केल्यास यश निश्चितच मिळेल, असे प्रतिपादन केले. त्या त्या वेळेत ते ते काम पूर्ण झाले तरच प्रगती होत असते तसेच तुमच्या चमकदार कामगिरीमागे आई-वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी उभे असतात. वडिलांनी आम्हाला शिस्त आणि संतांचे संस्कार शिकविले आणि आजपर्यंत त्यांचे आम्ही पालन करत आहोत, असेही ते म्हणाले.

## मोहोपाड्यात माझी लाडकी बहीण योजनेचा आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शुभारंभ



**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उरण विधानसभेच्या वतीने मोहोपाडा येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १४) करण्यात आला. या वेळी या योजनेसाठी महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले.

मोहोपाडा एचओसी कॉलनीमधील साईबाबा मंदिरात झालेल्या या योजनेच्या शुभारंभ सोहळ्यास भाजपचे खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा उपाध्यक्ष रामदास ठोंबरे, राष्ट्रवादीचे नेते संदीप मुंडे, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, वासांबे (मोहोपाडा) सरपंच उमा मुंडे, चौक सरपंच रितू ठोंबरे, सावळे सरपंच सुनील माळी, भाजप गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, केळवणे विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, वासांबे विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, युवा मोर्चा अध्यक्ष प्रणित सांगळे, पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, पोयंजे विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, खालापूर तालुका सरचिटणीस प्रवीण जांभळे, कराडे खुर्द माजी सरपंच विजय मुरकुटे, वासांबे माजी सरपंच ताई पवार, सदस्य आकाश जुईकर, भूषण पारंगे, लोधीवली सदस्य निखिल पाटील, युवा नेते स्वप्नील राऊत, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी या व इतर योजनांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'एक्स'वर नवा रेकॉर्ड

### १०० दशलक्ष फॉलोअर्स!

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर आणखी एक विक्रम नोंदवण्यात आला आहे. त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (पूर्वीचे ट्विटर) रविवारी (दि. १४) तब्बल १०० दशलक्ष म्हणजेच १० कोटींहून अधिक फॉलोअर्स झाले आहेत. यासह पंतप्रधान मोदी सर्वाधिक फॉलो केले जाणारे जागतिक नेते बनले आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन (३८.१ दशलक्ष फॉलोअर्स), दुबईचे शासक शेख मोहम्मद (११.२ दशलक्ष फॉलोअर्स), पोप फ्रान्सिस (१८.५ दशलक्ष फॉलोअर्स) यांसारख्या जागतिक नेत्यांच्या तुलनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी खूप पुढे आहेत. भारतात पंतप्रधान मोदींच्या फॉलोअर्सची संख्या इतर भारतीय राजकारण्यांपेक्षा जास्त आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे २६.४ दशलक्ष फॉलोअर्स आहेत, तर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे २७.५ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. याबाबत प्रतिक्रिया देताना नरेंद्र मोदी म्हणाले, या माध्यमात राहून खूप आनंद झाला. चर्चा, वादविवाद, अंतर्दृष्टी, लोकांचे आशीर्वाद, रचनात्मक टीका आणि बऱ्याच गोष्टींचा आनंद घेत आहे. भविष्यातसुद्धा अशाच आकर्षक वेळेची वाट पाहत आहे.




# भावनिक होऊन प्रश्न सुटत नाही

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामतीमध्ये प्रतिपादन

**बारामती : प्रतिनिधी**

विधानसभेला आपल्याला महायुतीला निवडून द्यायचे आहे. हौसे, नवसे, गवसे येतील, पण 'अजितदादा' हा शब्द देणारा आहे. भावनिक होऊन प्रश्न सुटत नाहीत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी (दि.१४) बारामतीमध्ये केले. बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान रॅली आयोजित करण्यात आली होती.



या रॅलीमध्ये बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खोचक शब्दांमध्ये विरोधकांवर टीका केली. ते म्हणाले की, भावनिक होऊन प्रश्न सुटत नाहीत. विकासाचे ध्येय ठेवून पुढे जायचे आहे. मला बारामती बघत इतर तालुके, पुणे, महाराष्ट्र फिरायचा आहे. चंद्र आणि सूर्य आहे तोपर्यंत संविधानाला कोणी धक्का लावणार नाही. त्यांनी सांगितले की, आम्ही खोटे बोलणार नाही. आम्ही सत्तेसाठी हपापलेलो नाही. सत्ता येत असते, जात असते. सत्तेचा ताम्रपट घेऊन कोणी आलेला नाही. सत्तेचा वापर गरिबांसाठी झाला पाहिजे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

एमएसपी संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, मी काल अमित शाह यांची भेट घेतली व साखरेच्या संदर्भात त्यांच्याशी बोलणी केली. एमएसपी वाढवायला पाहिजे, असे त्यांना सांगितले. त्या संदर्भातील निवेदन त्यांना उद्या देणार आहोत.

२१ जुलै रोजी पुणे दौऱ्यावर येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कांदा, दूध पावडर आयात केलेली नाही. जगाची आर्थिक राजधानी मुंबई करायची आहे. चुकीच्या प्रचारावर जो काही नरेटिव्ह सांगण्याचा प्रयत्न करतील, त्यावर विश्वास ठेवू नका असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. जनसन्मान मेळाव्यामधून प्रत्येक जिल्हा तालुका ढवळून काढायचा असल्याचेही ते म्हणाले.

## थिएटरमधील सामान चोरणाऱ्यांना अटक

### पाच लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेली जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींना कर्जत पोलिसांनी अटक करून पाच लाख ८२ हजार रुपये किमतीचा मुद्येमाल जप्त केला आहे.



आमराई परिसरातील राजनोवा थिएटर बंद असल्याचा फायदा घेऊन थिएटरमधील डॉल्बी साउंड बॉक्स, ॲम्प्लिफायर व इतर सामानाची चोरी करून पसार झाल्योबाबत थिएटरचे मालक ताटीपल्ली मोहनराज यांना काही दिवसांनी समजले. त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली. गुन्ह्याचे गांभीर्य पाहून उपविभागीय पोलीस अधिकारी धुळा टेळे, निरीक्षक सुरेंद्र गरड यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सतिष शिंदे, हवालदार समिर भोईर, स्वप्नील येरूणकर, अनिल वडते, पोलीस नाईक संतोष साळुंखे, केशव नागरगोजे, शिपाई गणेश पाटील, भरत पावरा, आकाश राठोड, रोहित खरात, रवींद्र लोहकरे यांचे पथक तयार करून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे व गोपनिय बातमीदाराचे मदतीने आरोपींना अटक केली.

आरोपींना सहा दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपीकडे अधिक चौकशी करून चोरीस गेलेले १० डॉल्बी स्पीकर, आठ ॲम्प्लिफायर स्पीकर, एक बास मॅनेजमेंट मशीन असे एकूण पाच लाख ८२ हजार रूपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी –जिल्हाधिकारी



**अर्ज भरण्यासाठी मिळणार प्रोत्साहन भत्ता**

**गावपातळीवर ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, नागरी, सेतू केंद्रातील प्रतिनिधी, समुदाय संसाधन व्यक्ती यांची समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन अर्ज पूर्ण भरण्यासाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, नागरी, सेतू केंद्रातील प्रतिनिधी, समुदाय संसाधन व्यक्ती यांना प्रतिअर्ज ५० रुपयांप्रमाणे प्रोत्साहन भत्ता सरकारतर्फे देण्यात येणार आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी सांगितले.**

**रायगड : प्रतिनिधी**

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी, आर्थिक स्वातंत्र्य, त्यांचे आरोग्य, पोषणात सुधारणेसाठी आणि बळकटीकरणासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना ऐतिहासिक योजना आहे. या योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, उपजिल्हाधिकारी सा.प्र.रविंद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण निर्मला कुचिक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनित म्हात्रे, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम कोशेट्टी, अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांनी, या योजनेचे जिल्ह्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी सूक्ष्म नियोजन करावे अशा सूचना या वेळी दिल्या, तसेच ग्रामपंचायत, शहरांमध्ये योजनेची व्यापक प्रसिद्धी करावी. प्रत्येक शनिवार चावडी वाचनचे आयोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

नारी शक्ती दूत ॲपमध्ये लाभार्थी महिलेचे नाव भरताना आधारकार्डनुसार अर्जदाराचा संपूर्ण पत्ता आणि अन्य माहिती तंतोतत भरावी, अशी सूचना करण्यात आली आहे. आधार कार्डवरील नावाप्रमाणे बँकेच्या खात्यावरही तेच नाव असावे, तसेच बँक खाते आधारशी संलग्न असावे.

## खातेदारांना फसवणाऱ्या 'बबली'विरुद्ध गुन्हा

### ३८ लाखांचा फेरफार केल्याचा आरोप

**खोपोली : प्रतिनिधी**

बँकेत येणाऱ्या खातेधारकांचा विश्वास संपादन करून त्यांच्या आर्थिक व्यवहारादरम्यान खात्याशी छेडछाड करून सुमारे ३८ लाख तीन हजार ५०० रुपयांची फसवणूक करणाऱ्या कल्याणी अशोक भोईर (रा.मोहपाडा खालापूर) विरूद्ध बँक व्यवस्थापक निखिल चंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे ग्राहकांमध्येही संतापाचे वातावरण पसरले आहे.




कल्याणी भोईर ही रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील मोहपाडा येथील एचडीएफसी बँकेत नोकरीला होती. १ जानेवारी २०१७ ते २९ फेब्रुवारी २०२४पर्यंत कल्याणी हिने पदाचा गैरफायदा घेऊन बँकेत येणारे खातेधारकांना विश्वासात घेऊन त्यांच्या आर्थिक व्यवहारा दरम्यान ओळख करून घेतली. ग्राहकांना जम्बो लोन, इन्स्टा लोन, आरडी, एफडी, क्रेडीटकार्ड, नेट बँकिंग इ. सुविधा जलदरितीने पुरवण्यासाठी त्यांचा विश्वास संपादन केला. खातेदारांचे नाव, बचत खाते, मोबाईल नंबरचा गैरवापर करून त्यांचे नावे क्रेडिट कार्ड देवून त्यापैकी काही बंद केल्याचे कल्याणी हिने भासवले.

प्रत्यक्षरित्या ते क्रेडिटकार्ड चालू ठेवून त्याद्वारे फसवणूक करून काही खातेदाराचे नकळत त्यांच्या नावे नवीन क्रेडीट कार्ड काढून कल्याणी हिने तिचे स्वत:साठी व इतर कामासाठी वापर करून त्यावर कर्ज काढले, तसेच परतफेड स्वत: न करता तसेच खातेदारांना वेगवेगळी कारणे देऊन त्यांच्या कोऱ्या अर्जावर सह्या घेतल्या. त्याद्वारे क्रेडीट कार्ड डिटेल्स परस्पर बदलून त्यामध्ये अज्ञात व्यक्तीचा मोबाईल नंबर व बनावट ई–मेल आयडी रजिस्टर करून अर्जदारांचे खात्याशी छेडछाड केली.

खातेदारांना अंधारात ठेवून कल्याणी भोईर हिने एकूण ३८ लाख तीन हजारांची फसवणूक केली आहे. ग्राहकांच्या तक्रारी वाढल्यानंतर बँक व्यवस्थापक निखिल चंद्रे यांनी चौकशी केली असता, फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला. याबाबत बँक व्यवस्थापक चंद्र यांनी रसायनी पोलीस ठाणे येथे कल्याणी भोईरविरोधात तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पो. नि. संजय बांगर करीत आहेत.

या प्रकारामुळे ग्राहकांमध्येही संतापाचे वातावरण पसरले असून कल्याणी भोईरवर कारवाई करून तिला कठोर शिक्षा देऊन ग्राहकांचे पैसे परत देण्याची मागणी होत आहे.

## कर्जत–बीड रस्ता पाण्याखाली

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील बीड गावाकडे जाणारा रस्ता उल्हास नदीला आलेल्या पुरामुळे पाण्याखाली गेला आहे.



उल्हास नदीच्या पात्रात बांधलेल्या भिंतीमुळे कर्जत बीड रस्ता पाण्याखाली गेला असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे उल्हास नदीमध्ये बांधण्यात आलेली भिंत तोडण्यात यावी आणि नदीचा प्रवाह बदलू नये, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

उल्हास नदीच्या तिरावर बीड गाव वसले असून त्या गावाकडे जाण्यासाठी मोहिली येथील पुलावरून जावे लागते. त्या गावाकडे जाणारा रस्ता यापूर्वी कधीही पावसाळ्यात आलेल्या पुरात बंद झाला नव्हता, मात्र उल्हास नदीवर मोहिली पुलाच्या खाली असलेल्या नदीपात्रात संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. त्या भिंतीमुळे उल्हास नदीमधून वाहून जाणारे पाणी हे थेट नेहमीच्या मार्गाने वाहून न जाता पावसाच्या पाण्याचा प्रवाह बदलला आहे.

या पाण्याच्या प्रवाहाचे पाणी बीड गावाकडे जाणारा रस्ताकडे वळले. त्यामुळे कर्जत–बीड रस्ता पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे असे सतत होऊ शकत असल्याने उल्हासनदीच्या पात्रता बांधण्यात आलेली भिंत तोडण्यात यावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थ करीत आहेत.

## खालापूर प्रेस क्लबने केला शेतकऱ्यांचा सत्कार

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर प्रेस क्लबच्या वतीने प्रगतशील शेतकरी शिवाजी ठाकूर व अर्पिता पाटील या शेतकऱ्यांचा गौरव शेताच्या बांधावर करण्यात आला. तालुका मंडळ कृषी अधिकारी नितीन महाडिक यांची प्रमुख प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी टेंभरी सरपंच रमेश गायकवाड, उपसरपंच निखील पाटील, माजी उपसरपंच रोशन गायकवाड, सदस्य महेंद्र मोरे, अपर्णा पवार, ग्रामसेवक गोलुकदास राठोड, कृषी सहाय्यक सुमित भगत, रवींद्र देशमुख तसेच होराले सरपंच नीलम भूईकोट, उपसरपंच नागेश पाटील, शंकर मानकवले, ललिता जाधव, सुरेखा दळवी, वैशाली खराडे, अविराज बुरूमकर, पत्रकार बाबू पोटे आदी उपस्थित होते.



## आषाढी यात्रेसाठी पंढरपुरात वारकऱ्यांचा मेळा

### तीन लाख भाविक दाखल; रांगेचे १० पत्रा शेड हाउसफुल्ल

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आषाढी यात्रेचा सोहळा अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. यामुळे पंढरपुरात येणाऱ्या भाविकांची गर्दी आता वाढू लागली आहे. आज जवळपास तीन लाखाहून अधिक भाविक पंढरपूरमध्ये दाखल झाले असून भाविकांची गर्दी अजूनही वाढतीच आहे. विठ्ठल रुक्मिणी पदस्पर्शनाची दर्शन रांग गोपाळपूर रोडवरील पत्रा शेडपर्यंत गेली आहे.



पंढरपुरात भक्तीचा मळा भरण्यास सुरवात झाली आहे. बुधवारी (दि.१७) आषाढी एकादशी असल्याने विठुरायाच्या दर्शनासाठी भाविक पंढरपुरात दाखल होत आहेत. शिवाय आता पायी वारी करीत निघालेल्या पालखी दिंड्या देखील दाखल होत असल्याने भाविकांची गर्दी दिवसागणिक वाढत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. चंद्रभागा स्नान करून भाविक दर्शनासाठी रांगेत लागत आहेत. आषाढीनिमित्त पंढरपूरमध्ये विठ्ठलनामाचा जयघोष सुरू झाला आहे.

पंढरपूरमध्ये येणाऱ्या भाविकांची रिघ सुरूच आहे. आजच्या स्थितीला तीन लाख भाविक पंढरपुरात दाखल झाले असून येत्या दोन दिवसांत भाविकांची संख्या पाच लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने मंदिर समिती व प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी असलेल्या रांगेसाठी तयार केलेले दहा पत्राशेड भाविकांच्या गर्दीने आतापासूनच हाउसफुल्ल झाले आहेत.

पान १ वरून

## रायगडात मुसळधार पर्जन्यवृष्टी



खबरदारीचा उपाय म्हणून नगर परिषदेने हा पूल रहदारीसाठी दिवसभर बंद ठेवला होता. पुलाच्या दोन्ही बाजूला पोलीस व नगरपरिषद कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

पाताळगंगा नदीचे पाणी पनवेल तालुक्यातील आपटा गावाच्या काही भागांमध्ये शिरले होते. आपटा–रसायनीदरम्यान खिंडीतील रस्त्याची उंची वाढवली असल्याने नदीचे पाणी तेथे फार कमी होते व वाहतूक सुरू होती. आपटा–खारपाडा आणि आपटा–पनवेल मार्गावर पाणी आल्याने वाहतूक काही काळ बंद झाली होती. पाताळगंगा एमआयडीसीच्या सिद्धेश्वरी कॉर्नरजवळ पाणी साचले होते.

उल्हास नदीच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने नेरळ–दहिवली पूल पाण्याखाली गेला. कर्जतमध्ये शहराच्या बाजूने वाहणाऱ्या या नदीची पाणी पातळी वाढली होती. पात्र कधीही उलटून पाणी शिरण्याची स्थिती निर्माण झाली होती, परंतु मात्र पावसाने थोडी विश्रांती घेतल्याने नदीचे पाणी ओसरले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

पोलादपूर तालुक्यातील चिरेखिंड ते अंबेमाची मार्गावर दरड कोसळली. माथेरान घाटातही पहाटे दरड कोसळली होती. प्रशासनाने ती हटवून वाहतूक पूर्ववत केली.

## आरोग्य महाशिबिरासंदर्भात नियोजन बैठकीत चर्चा

या बैठकीस भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, बबन मुकादम, मनोहर म्हात्रे, डॉ. अरुणकुमार भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, संगीता कांडपाळ, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, भूपेंद्र पाटील, राज पाटील, भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष तथा शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, डॉ. संतोष आगलावे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन केले तसेच उपस्थितांमध्ये शिबिराविषयी चर्चा झाली.

## विद्यार्थ्यांनो, आदर्श नागरिक बना –शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे

इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा शनिवारी (दि. १३) आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी महारुद्र नाळे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्ष तेखाली झालेल्या या सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, माजी नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, सुशीला घरत, वृषाली वाघमारे, सीकेटी उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, स्वाती पाटील, निरजा अधुरी, वैशाली पारधी यांच्यासह पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे यांनी आपल्या मनोगतात कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाची प्रशंसा केली तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर शैक्षणिक क्षेत्रासह समाजकारणात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ते म्हणजे परीस आहेत. त्यांच्या संपर्कात जे येतात त्यांचे सोने झाल्याशिवाय राहत नाही. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रूपात त्यांनी एक दर्जेदार शिक्षण संस्था उभी केली आहे आणि या संस्थेचा वेलू निश्चितच गगनावर पोहचलेला आहे, असे नमूद केले.

संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, दहावी व बारावी ही दोन्ही वर्ष विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी आहेत. त्यामुळे आपला मार्ग निवडताना विद्यार्थ्यांनी वडीलधाऱ्यांचा व शिक्षकांचा सल्ला निश्चितच घेतला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने जीवनात सक्षम बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, कारण येणारी आव्हाने खडतर आहेत. ती आपण पेलू शकलो पाहिजेत. या वेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना आशीर्वाद दिले.

या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांना रक्कम व सन्मानचिन्ह असे पारितोषिक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या तसेच संस्थेच्या उल्लेखनीय प्रगतीचा चढता आलेख विषद केला. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांच्या आभार प्रदर्शनानंतर संगीत शिक्षिका अर्चना पाटील यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### दुखवटा

**विष्णू म्हात्रे**

**मोहोपाडा** : मोहोपाडा येथील भाजपचे विष्णू मंगळ्या म्हात्रे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



मृत्यूसमयी ते ६४ वर्षांचे होते. १९७३पासून ते मोहोपाडा येथे टेलरिंगचा व्यवसाय करीत होते. रात्री झोपेतच त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले. विष्णू म्हात्रे यांच्यावर शोकाकूल वातावरणात रिस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी २१ जुलै रोजी गुळसुंदे येथे तर तेरावे २५ जुलै रोजी मोहोपाडा येथील निवासस्थानी होणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### खारघर येथे रिक्षाची चोरी

**पनवेल :** बस स्टॉपजवळ उभ्या रिक्षाची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. तुकाराम गाटे यांचे खारघर येथे मंडप बांधण्याचे काम सुरू असल्याने त्यांनी त्यांची रिक्षा सेक्टर ५ येथील बस स्टॉपजवळ उभी करून ठेवली असताना अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### झोपड्यांमध्ये शिरले पाणी



**मोहोपाडा :** कराडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या बेलंतरा सोसायटीच्या समोरील जवळपास २५ झोपड्यांमध्ये तसेच सिद्धेश्वरी कॉर्नर जवळ असलेल्या उज्वल लॉज परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने तेथील रहिवाशी व उज्वल लॉजचे (सध्याचे रसायनी हॉटेल) नुकसान झाले आहे. या बाबत येथील रहिवाशांनी भाजपचे किरण माळी यांना समस्येबाबत व्यथा मांडली. त्यांनी पनवेलचे तहसीलदार, तलाठी, पाताळगंगा एमआयडीसीचे अधिकारी, कराडे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना मोबाईलद्वारे संपर्क साधून समस्येबाबत माहिती दिली. एमआयडीसीचे उपअभियंता किशोर राऊत, राठोड, ग्रामसेवक निवृत्ती आंधळे ताबडतोब घटनास्थळी आले. एक-दोन दिवसांत पाणी जाण्यासाठी वाट करून दिली जाईल व यापुढे पाणी तुंबून कोणाचे नुकसान होणार नाही, असे आश्वासन दिले.

### सोन्याच्या अंगठीची चोरी

**पनवेल :** ५० हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या अंगठीची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अर्चना जगताप या चिंध्रण येथे राहणाऱ्या असून त्या ब्लड कॅम्प डोनेशन कामाकरिता घणसोली येथे गेल्या होत्या. त्यांनी हातात असलेली सोन्याची अंगठी प्लास्टीकच्या छोट्या डबीमध्ये ठेवून ती डबी बॅगेत ठेवली होती. त्या परत घरी आल्या असता त्यांनी बॅग उघडून पाहिले असता त्यात त्यांना अंगठी मिळून आल्याने त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे.

### स्लॅबसह भिंत कोसळली



**पनवेल :** तालुक्यातील चिपळे येथील धोकादायक बनलेल्या इमारतीचा स्लॅब आणि भिंत कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने या इमारतीत कोणीही राहत नाहीत. चिपळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील चिपळे येथील माऊंट व्ह्यू इमारतीतील आठ इमारती धोकादायक बनलेले आहेत. ग्रामपंचायतीने त्यांना नोटीसदेखील बजावली आहे. धोकादायक बनलेल्या या माऊंट व्ह्यू बिल्डिंग नंबर तीन मधील स्लॅब आणि भिंत कोसळली या इमारतीत कोणीही राहत नसल्याने जीवितहानी टळली आहे. येथील इमारतीचा स्लॅब आणि भिंत कोसळल्याची घटना घडली त्यामुळे तलाठ्यांनी पंचनामा करून शासनाला कळवावे, अशी मागणी येथील रहिवासी करत आहेत.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरला

**पनवेल :** खारघर, सेक्टर-४ मधील परदेशात गेलेल्या कुटुंबाचे घर फोडुन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरातील सुमारे ३.८० लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.चोरट्यांनी पारख यांच्या घरातील ८० हजाराची रोख रक्कम तसेच तीन लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने असा सुमारे ३.८०लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. पारख यांच्या घराचा कडी-कोयंडा तुटल्याचे शेजाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर प्रकार उघडकीस आला. त्यानंतर रेल विहार सोसायटीच्या अध्यक्षांनी खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

### पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल :** परिमंडळ १ व परिमंडळ २ अंतर्गत अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या पोलिसी सेवेच्या मुदत संपल्याने त्यांच्या तात्काळ बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नेरुळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांची पनवेल शहर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. तर रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी यांची नेरूळ पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक माणिक नलावडे यांची वाशी पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे. रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांची खारघर पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली आहे.

### पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**मोहोपाडा :** शनिवारपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे पाताळगंगा नदीने रविवारी धोक्याची पातळी गाठली असून पुढेही पावसाची मुसळधार सुरूच राहिली तर पाताळगंगा नदीला पुर होण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. अनेक पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले. रविवारी मोहोपाडा आठवडी बाजार असल्याने भरगच्च भरणारा बाजार दुपारपर्यंत सामसूम दिसत होता. दांड रसायनी रस्त्यावर काही सखल भागात पाणी साचल्याने ये-जा करणाऱ्या प्रवाशांना व पादचाऱ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. रविवारी सकाळपासूनच पावसाची मुसळधार सुरूच असल्याने रसायनीकरांनी महत्त्वाच्या कामाव्यतिरीक्त घराबाहेर जाण्याचे टाळले.

# मुसळधार पावसामुळे पनवेल मनपा अलर्ट

## ◆ सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे आयुक्तांचे निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हवामान विभागाने रायगड जिल्ह्यात अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसेच गेले दोन दिवसापासून पनवेल महापालिका क्षेत्रात जोरदार पर्जन्यवृष्टी होत असून शनिवारी (दि. १३) १५५ मिमि पाऊस महापालिका क्षेत्रात झाला. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर असून पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत.

जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. दर तासाला पाणी साठणाऱ्या भागाचे अपडेटस् देण्याविषयी सूचित करण्यात आले आहे. कळंबोली मध्ये भरपूर पाणी साठते, त्यामुळे कळंबोलीमधील पाणी उपसा करणारे डिझेल व इलेक्ट्रिक पंप सातत्याने सुरू ठेवण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत तसेच पनवेलमध्ये गाढी नदीची पातळी इशारास्तरापर्यंत पोहचली नसली तरी सातत्याने नदीचे पाणी वाढते आहे. नदीच्या पाणी पातळीवर देखील लक्ष ठेऊन याबाबत माहिती देण्याच्या सूचना प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

हवामान खात्याने पुढील काही दिवस रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व तयारी करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत मदत शिबिरे, त्यांच्या पाणी, चहा जेवणाची सोय करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली आहे.

नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्या सर्व विभागांनी आयुक्तांच्या निर्देशानुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोडवर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त व उपायुक्तांनी महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.







पनवेल : राजेश गांगर यांनी वेल वेअर हे कपड्यांचे दुकान नव्याने सुरू केले आहे. या दुकानात रेमंड, सियाराम्स, अरविंद या ब्रँडचे कपडे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. दरम्यान, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत राजेश गांगर यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी गणेश भोसले, विद्याधर हेगडे, सचिन ठाकूर आदी उपस्थित होते.





पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे वरिष्ठ सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रयत्नाने रयतसेवकांच्या बदलीला स्थगिती मिळाली आहे. याबद्दल रायगड विभागीय बदलीपात्र रयतसेवकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले. या वेळी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, लाइफ वर्कर एम.आर. पाटील, अनिल पाटील, एस.डी.म्हात्रे, राहुल चिपळेकर, सुप्रिया पाटील, प्रणाली पाटील, योगिता पाटील आदी रयतसेवक उपस्थित होते.



पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या चिंचवली तर्फे तळोजे येथील शाळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी माजी उपसरपंच परशुराम रिकामे, संतोष मुंढे, दिनेश पाटील, रामचंद्र खाने, लहू मुंढे, दीपक रिकामे, सुरेश रिकामे, प्रमोद दिसले, संदेश ठोंबरे, हर्षद बोलाडे, शालेय शिक्षक मुख्याध्यापक संवादकर आणि शिक्षक ठाकूर आदी उपस्थित होते.

## रोडपाली परिसरात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कळंबोली, रोडपाली, नवी मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी श्री म्हसोबा देवस्थान तलाव, रोडपाली परिसरात रविवारी (दि. १४) वृक्षारोपण केले. ज्यामध्ये वडाच्या पिंपळ, कडुनिंब, जामुन इत्यादी जीवनासाठी उपयुक्त आणि पर्यावरणात सुसंवाद राखणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्यात आली.

या वेळी सामाजिक कार्यकर्त्यांनी सर्वांना वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले व सांगितले की, माणसाला हवे असेल तर आपल्या जीवनात उपयोगी पडेल व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करून उदात्त कार्य करू शकतो.

प्रजापती समाज विकास मंडळाचे अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती, मुख्य सरचिटणीस विनोद प्रजापती, सुजित गुप्ता, अभिजित गुप्ता, अशोक मिश्रा, सतीश सिंग, विशाल सिंग, सतीश ढोलवानी आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी या उदात्त कार्यात उत्साहाने सहभाग घेतला.

## 'तीर्थराज'च्या निवडणुकीत 'परिवर्तन'

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



खांदा कॉलनी सेक्टर ९ प्लॉट नंबर ३ येथील तीर्थराज सहकारी गृहनिर्माण संस्थेची पंचवार्षिक निवडणूक ७ जुलै २०२४ रोजी झाली. या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे १५चे १५ उमेदवार स्पष्ट बहुमताने निवडून आले. विजयी सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सोसायटीमधील सर्व युवा सदस्यांनी विशेषकरून सचिन फऱाड, प्रवीण पाटील, संतोष घेमुड, मयूर धाडवे, मोहन डोइफोडे, प्रदीप जुनघरे, सचिन मोकल, अक्षय वाघमोडे, राजेश जगताप, दिनेश शिरसागर, राकेश वाघमारे, शिवम जोशी व अनेक तरुण सदस्यांनी मेहनत घेतली.

परिवर्तनने मिळविलेला हा विजय ३२० सोसायटी सदस्यांचा व त्यांच्या भविष्यातील विकासासाठी असल्याचे सांगितले. सोसायटीमधील सदस्यांनी विजयी मिरवणुकीत सहभाग दर्शवून परिवर्तनला पूर्ण पाठिंबा दाखवला. या निवडणुकीत उमेदवार लता नाईकडे, अनुराधा जोशी, डॉ. अर्जुन घरत, राजेंद्र सूर्यगंध, संजय वाघमोडे, अनुराज लेकुरवाळे, डॉ. विनीत गुरमे, बबन फराड, दिगंबर डोईफोडे, संजय पाटील, सचिन राजपुरे, प्रमोद पाटील, नंदकिशोर जाधव, उदय कांबळे, राहुल काशीद या १५ सदस्य उमेदवारांचा विजय झाला आहे. ह्या निवडणूकीसाठी ॲड. अंकित बाळू म्हात्रे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सर्व प्रक्रिया झाली.

## लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे आज युवक मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेलने यशस्वी ग्रुप आणि पिल्लाई ग्रुप ऑफ इन्स्टिटूशन आणि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून सोमवारी (दि. १५) भव्य युवक मेळावा दुपारी ३ ते ५ या वेळेत नवीन पनवेल येथील पिल्लाईचे सभागृहात आयोजित केला आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व इतर मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

य मेळाव्यात विविध उद्योगातील मान्यवरांनी युवकांना नोकरी व व्यवसाय सुरू करण्यास कौशल्य वाढवण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले आहे. रायगड कौशल्य विभागाच्या अमिता पवार, उपआयुक्त कौशल्य, विकास व रोजगार व उदयोजग विभागातर्फे महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे व उपलब्ध असणाऱ्या शासनाच्या सहाय्याबद्दल युवकांना मार्गदर्शन करतील. विविध शिक्षण कौशल्य, शिक्षण संस्था त्यांनी राबविलेल्या विविध कोर्सेसची माहिती देतील व युवकांनी कोणते कोर्सेस करावे याबद्दल मार्गदर्शन करतील.

प्रतिष्ठित वक्ते रोजगाराच्या संधी आणि उद्योजकता उपक्रमांचा पाठपुरावा करण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी व त्याचा कसा फायदा घेता येईल या विषयावर मौल्यवान मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमात सहभागासाठी नोंदणी शुल्क नाही तसेच कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व युवकांना प्रमाणपत्र सांगता कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक कॉलेजच्या ग्रुपप्रमाणे देण्याचे आयोजन केलेले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी https://bit.ly/registrationforyouthskilldayforstudents उद्योगातील शिकाऊ उमेदवारांसाठी https://bit.ly/registrationlinkforindustrialcandidates ही लिंक मोबाईलमध्ये ओपन करावी.

युवकांना एस.जी. चव्हाण लायन्स क्लब पनवेलचे अध्यक्ष व रिजनल डायरेक्टर यशस्वी अकॅडमी आणि अशोक गिल्डा सचिव लायन्स क्लब पनवेल व मनोज म्हात्रे, खजिनदार आणि मिलिंद सूर्यवंशी, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आवाहन करत आहेत. अधिक माहितीसाठी ॲड. मिलिंद सुर्यवंशी (९३७०४११६५१), प्रमोद गजहंस (९३७२६०३८६५), समाधान जावळे (९३२४७२५५२४) यांना संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष एस. जी. चव्हाण, सचिव अशोक गिल्डा, खजिनदार ॲड. मनोज म्हात्रे, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर ॲड. मिलिंद सूर्यवंशी यांनी केले आहे.

## संपादकीय

# मान्सून सक्रिय

पावसाने राज्यात जोर धरला असून मान्सून सक्रिय झाल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या दोन दिवस पडणाऱ्या पावसाने विशेषतः कोकण पट्ट्यात जोरदार वृष्टी केली असल्याने जनजीवन विस्कळीत झाले, परंतु हा पाऊस शेतीला पूरक असून धरणांच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने टंचाईही दूर झाली आहे.

**यंदा वरुणराजाचे वेळेत आगमन होणार आणि तो जोरदार बरसणार असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला होता, मात्र हा अंदाज नेहमीप्रमाणे चुकला. हवामान खात्याचे वादळासंदर्भात दिलेले अंदाज अचूक ठरतात, मात्र पाऊस त्यांना हुलकावणी देत असल्याचा आजवरचा अनुभव आहे. यंदाही तसेच झाले. पाऊस लवकर येणार या आशेने शेतकऱ्यांनी जोरदार तयारी केली होती. शेतकरीच कशाला समस्त नागरिक पावसाची वाट पाहत होते, कारण जलाशये आटल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. आधीच प्रचंड उष्णता आणि वर पाणीटंचाई अशा दुहेरी त्रासामध्ये लोक होते. त्यामुळे सारे जण चातकासारखी पावसाची प्रतीक्षा करीत होते, पण कसले काय सुरुवातीला केवळ शिडकावा झाला आणि पावसाने दडी मारली ती अगदी महिनाभर. अधूनमधून सरी आल्या, मात्र त्यात जोर नव्हता. जुलै महिन्याचा पहिला आठवडाही कोरडा गेला. त्यामुळे सर्वांच्याच तोंडचे पाणी पळाले होते. अखेर आषाढाच्या दुसऱ्या दिवसी पावसाला सुरुवात झाली. तेव्हापासून पाऊस दमदारपणे पडत आहे. गेल्या दोन–तीन दिवसांपासून पावसाने वेग वाढवला असून सर्वदूर बरसात होत आहे. कोकण किनारपट्टीला तर पावसाने अक्षरश: झोडपून काढल्याचे चित्र आहे. त्यामुळे जिकडेतिकडे पाणी साचले. वाहतुकीवरही याचा परिणाम झाला. सध्या नद्या, नाले, ओढे भरून वाहत आहेत. काही नद्या धोक्याच्या पातळीवर वाहत असल्याने त्या भागात पुराचे पाणी शिरले. यामध्ये नागरिकांचे नुकसानही झाले आहे, तर रस्ते, पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक विस्कळीत झाली. गावांचा संपर्क तुटला. पावसाळ्यात अशी परिस्थिती निर्माण होत असते. विशेषकरून कोकणात जुलै महिन्यात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्यावर असे चित्र पहावयास मिळते. त्यानंतर हळूहळू पावसाचा जोर ओसरतो. या पावसाने सध्या सगळ्यांची तारांबळ उडवली असली तरी शेतीसाठी हा पाऊस पूरक आहे. मध्यंतरी पावसाअभावी शेतीची कामे खोळंबली होती. काही ठिकाणी तर दुबार पेरण्यांचे संकट होते, परंतु वरुणराजाने बळीराजाला दिलासा देत हजेरी लावली आणि सारे चित्र पालटले. दुसरीकडे जोरदार पावसामुळे पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न मिटला आहे. धरण क्षेत्रांमध्ये चांगला पाऊस पडल्याने पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. एकंदर सध्या पावसाने धांदल उडवली असली तरी तो काही चांगल्या गोष्टीही सोबत घेऊन आला आहे. दरम्यान, असाच पाऊस पडत राहिल्यास परिस्थिती बिकट होऊ शकते. त्यामुळे सर्वांनी सतर्क राहिले पाहिजे. नागरिकांनीही अतिवृष्टीमध्ये आवश्यकतेशिवाय घराबाहेर पडणे टाळावे. प्रशासन आपल्या परीने दक्षता, उपाययोजना करीत आहे. अशा वेळी सर्वांनी त्यांना साथ देणे आवश्यक आहे. पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती घडण्याची शक्यता असते. त्या दृष्टीने काळजी घेणे गरजेचे आहे. विशेषत: अतिउत्साही मंडळींनी काही करामती करू नये. धबधबे, धरणांवर पर्यटनास जाताना सभोवलातच्या स्थितीचे अवलोकन करावे. स्वत:सह इतरांचा जीव धोक्यात घालून सर्वांना अडचणीत आणण्यापेक्षा घरी सुरक्षित राहणे केव्हाही चांगले. तेव्हा नैसर्गिक घटकांचा सन्मान करा.**

# आषाढी एकादशीच्या ओढीने कर्जत भक्तीमय





**खबरबात**
विजय मांडे

कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताहांना सुरुवात झाली आहे. तालुक्यातील पंचेचाळीस गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या सप्ताहांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम केले जातात. कर्जत शहरापासून ते अगदी तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातही अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या चार–पाच महिन्यात कर्जत तालुका भक्तिमय असतो. आषाढी व कार्तिकी वारी साठी कर्जत तालुक्यातून हजारो भाविक जात असतात. यंदा शेती लायक पाऊस पडत असल्याने बहुतांश गावांमधील भात पिकाच्या लावण्या झाल्या असल्याने शेतकरीसुद्धा पंढरपूरच्या वाटेने निघाला आहे.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन वर्षांपूर्वी करण्यात आपले होते. त्यानंतर भाऊ केलटकर, हरिभाऊ वैद्य, विश्वासराव शिंदे, नामदेव दगडे, ह. भ. प. हरिभाऊ महाराज राणे, ह. भ. प. मारुती महाराज राणे, वसंत दानवे, सुरेश पिंपरे आदींनी कर्जत तालुका परिसर कर्जतच्या श्री कपालेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या छोटयाशा मैदानात नेण्यात आले. त्याचे स्वरूप इतके वाढले की नंतर ज्ञानेश्वर माऊलींचे सप्त शताब्दी वर्षानिमित्ताचे औचित्य साधून १९९१ सलापासून हा सप्ताह पोलीस मैदानात आयोजन करण्यात येऊ लागले.

या वेळी हे सर्व कार्यकर्ते ज्येष्ठ कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांच्याकडे गेले तेथे त्यांनी तुम्ही माळकरी होणार असेल तर मी तुमच्या सप्ताहात दोन दिवस किर्तनासाठी येईन. त्यावेळी विश्वासराव शिंदे, सुरेश पिंपरे, विश्वासराव शिंदे या तिघांनी त्यांच्या हस्ते तुळशीच्या माळा गळ्यात घातल्या आणि बाबामहाराज सातारकर कर्जतला आले. त्यांनी दोन दिवस कीर्तन सेवा केली. त्यावेळी कर्जत तालुक्यातीलच नव्हे तर रायगड, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी भाविक आले होते.

या सप्ताहाची देणगी रूपाने आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम चिवडेवाले म्हणून ओळखले जाणारे दत्तात्रेय देशमुख यांच्याकडे होती. सुरुवातीला नामदेव दगडे अध्यक्ष होते. त्यानंतर दामुअण्णा आठवले यांनी १९९० सालापासून अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. २००४ साली शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष झाले. त्यांच्या निधनानंतर ह. भ. प. नथुराम हरपुडे हे अध्यक्षपद सांभाळत आहेत. ज्ञानेश्वर तिवाटणे यांनी अनेक वर्षे सचिव पद सांभाळले होते. त्यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे. संतोष वैद्य, सुरेश पिंपरे, नरेंद्र जोशी, गणेश सोनी, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, वनिता म्हसे, शिवाजी भासे, शिवलाल गुप्ता, दत्तात्रेय म्हसे, संभाजी देशमुख, अमोल देशमुख आदी कर्जतच्या अखंड हरिनाम सप्ताहाची जबाबदारी सांभाळतात. हे सर्वच जण आषाढी वारीमध्ये उपस्थिती दर्शवित असतात. कर्जत मधील काही दानशूर भाविक पुणे, हडपसर, लोणी येथे अन्न सेवाही देत असतात.


ह. भ. प. मारुती महाराज राणे यांनी कर्जत सह अनेक तालुक्यात कीर्तन सेवा व अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हजारो जणांना व्यसनमुक्त केले. हजारो जणांना माळकरी केले. त्यांची कोंकण दिंडी प्रसिद्ध आहे. त्यांना रायगड मित्र पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक वारकरी त्यामध्ये सहभागी होतात. ह. भ. प. बाळासाहेब फणसे महाराज यांनी कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. ह. भ. प. वामन महाराज मोधळे, ह. भ. प. मोरेश्वर महाराज पेमारे, ह. भ. प. नथुराम महाराज हरपुडे, ह. भ. प. मारुती महाराज लोभी, ह. भ. प. भरत महाराज देशमुख, ह. भ. प. द्वारकानाथ महाराज देशमुख, ह. भ. प. प्रवीण महाराज फराट, ह. भ. प. हरिश्चंद्र महाराज जाधव, ह. भ. प. योगिनी महाराज थरकुडे आदी कीर्तनकारांनी कर्जतमध्ये कीर्तन रुपी सेवेने समाज प्रबोधनाचे काम केले. ह. भ. प. श्रीराम महाराज पुरोहित, हे सुद्धा कीर्तन, प्रवचने करून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या बहुतेक किर्तनकारांना रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. या सर्व किर्तनकारांना रंभाजी बुवा थोरवे, मनोहर कडू, सुरेशबुवा फराट हे अजूनही मृदुंगाची साथ देत आहेत.

तालुक्यात कर्जत, इंजिवली, वेणगाव, तमनाथ आदी अखंड हरिनाम सप्ताह प्रसिद्ध आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे सुमारे सहा महिने कर्जत तालुका भक्ती रसात डुंबलेला असतो. तसेच आषाढी व पंढरपूर वारीला जाण्यासाठी नेहमीच उत्सुक असतात. ज्यांना संपूर्ण वारीमध्ये सहभागी होता येत नाही. ते वारीच्या मार्गावर कुठेतरी सहभागी होऊन २५ ते ३० किलोमीटर चालत असतात तर काही जण आषाढी एकादशीच्या तीन चार दिवस आधी निघून पंढरपूरला पोहचतात.

# आज जागतिक युवा कौशल्य दिन

दरवर्षी १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिन तरुणांच्या क्षमता आणि कौशल्यांवर प्रकाश टाकण्यासाठी साजरा केला जातो. हा विशिष्ट दिवस आजच्या तरुणांना चांगले जीवन जगण्यासाठी एक उत्तम सामाजिक–आर्थिक वातावरण देण्याचा प्रयत्न करतो. ज्ञान विकसित करण्याची आणि विविध कौशल्यांच्या महत्त्वाविषयी चर्चा सुरू करण्यासाठी हा दिवस एक विलक्षण संधी आहे.

तरुणांना रोजगार, सन्माननीय नोकऱ्या आणि उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देण्याचे धोरणात्मक महत्त्व ओळखण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २०१४ मध्ये १५ जुलै हा जागतिक युवा कौशल्य दिन



म्हणून घोषित केला. तेव्हापासून जागतिक युवा कौशल्य दिन साजरा केला जातो.

या दिनाच्या निमित्ताने समाजातील तळागाळातील लोकांना नोकरीच्या, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते. तसेच तरूणांमधले कौशल्य ओळखून त्यांना प्रोत्साहन दिले जाते. तरूणांच्या क्षमतेला वाव मिळवून देणे हा या दिनाचा मुख्य हेतू आहे.

'कौशल्य भारत' अभियान ही भारत सरकारने सुरू केलेली योजना आहे. देशातील युवा वर्गाला अर्थार्जनाला उपयुक्त अशी कौशल्ये देऊन सक्षम करणे आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणची त्यांची उत्पादकता अधिक वाढवणे हा यामागचा हेतू आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# प्रोसेसर जुनाच, फोन नवा! वन प्लसमध्ये अनेक बदल

प्रिमिअम अँड्रॉईड फोन्ससाठी प्रसिद्ध असलेली कंपनी वनप्लसने नुकताच OnePlus Nord CE 4 Lite 5G हा स्मार्टफोन लाँच केला आहे. परवडणाऱ्या श्रेणीतील ५ जी फोनमध्ये याची उपस्थिती असेल असा बऱ्यापैकी चांगली फिचर्स यात कंपनीने दिली आहेत.



वनप्लसने Nord CE 4 Liteमध्ये नवा प्रोसेसर वापरलेला नाहीय. क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ६९५ SoC हा फाईव्ह जी आल्यापासून परवडणाऱ्या फोन्समध्ये वापरला जाणारा, चांगला चाललेला प्रोससर देण्यात आला आहे. जो व्हॉट्सअप, ओटीटी ॲप्स, गेम्स आदी आरामात हाताळू शकतो. तसेच ग्राफीक्ससाठी Adreno 619 GPU हा गेमसाठी वगैरे उपयुक्त आहे.

हा फोन 128GB आणि 256GB या स्टोरेजसह येतो. साधारणपणे आताच्या फोटो व्हिडीओ काढण्याच्या क्रेझला 256GB ची स्टोरेज स्पेस उपयुक्त आहे. परंतू, जर कमी वापर असलेल्या व्यक्तीला हा फोन घ्यायचा असेल तर 128GBची स्पेसही पुरेशी आहे. महत्त्वाचे म्हणजे दोन सीम कार्ड आणि त्याचबरोबर मेमरी कार्डही जोडता येते. यामुळे मेमरीची अधिकची गरजही पूर्ण होते. ८ जीबी रॅम सध्याच्या ॲप्स आणि वापरासाठी पुरेशी आहे. हा फोन खरेदी करण्यासाठी, फिचर्स पाहण्यासाठी इथे क्लिक करा...

वनप्लसने या वेळी फोनचा डिस्प्ले अपडेट केला आहे.६.६७–इंचाचा AMOLED डिस्प्ले देण्यात आला आहे. 120Hz रिफ्रेश रेटमुळे स्क्रोलिंग आणि व्हिडीओ एकदम स्मूथ प्ले होतात. तसेच उन्हात गेलात तर फोनचा डिस्प्ले तुम्हाला चांगली व्हिजिब्लिटी देतो. ॲमेझॉन प्राईम आणि इतर ओटीटीवर तुम्ही एचडी व्हिडीओ पाहू शकता. आम्ही वर्ल्डकपची फायनल जवळपास निम्मी या फोनवर पाहिली आहे. कुठेही लॅग किंवा तापल्याचे आम्हाला जाणवले नाही.

वनप्लसने केलेला आणखी एक मोठा बदल म्हणजे कॅमेरा आहे. गेल्यावेळी १०८ मेगापिक्सलचा कॅमेरा देण्यात आला होता. आता ५० मेगापिक्सलचा कॅमेरा देण्यात आलेला आहे. Sony LYT-६०० सेन्सर वापरण्यात आला आहे. जो प्रकाशात चांगले फोटो काढतो परंतू अंधारात डिटेल्समध्ये धडपडताना दिसला. १६MP सेल्फी कॅमेरा ठीकठाक फोटो काढतो. कॅमेरावर चांगले काम करण्याची गरज आहे. काही फोटो आम्ही सोबत जोडत आहोत.

# विचारवंत, वक्ते प्रा. शिवाजीराव भोसले



**निमित्त**

महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ विचारवंत, व्यासंगी लेखक व सुप्रसिद्ध वक्ते शिवाजीराव अनंतराव भोसले यांचा जन्म १५ जुलै १९२७ रोजी खटाव तालुक्यातील कलेढोण (सातारा जिल्हा) येथे अनसूयाबाई व अनंतराव या दांपत्यापोटी झाला. अनंतराव प्राथमिक शिक्षक होते, तर आई गृहिणी होत्या. वडिलांकडून त्यांना अमोघ वक्तृत्वाची देणगी मिळाली. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण कलेढोण व विटा येथे झाले.

माध्यमिक शिक्षण त्यांनी साताऱ्यात घेतले. बॅ. पी. जी. पाटील, शंकरराव खरात व डॉ. दत्ताजीराव साळुंखे हे तीन माजी विद्यापीठ कुलगुरू त्यांचे बोर्डिंगमधील सहाध्यायी होते. पुढे त्यांनी पुण्यातील महाविद्यालयातून तत्त्वज्ञान विषयात एम.ए. आणि पुढे एलएल.बी. पदव्याही संपादिल्या. विद्यार्थिदशेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील, वेदमहर्षी सातवळेकर, श्री. म. माटे, प्रा. प्र. रा. दामले, प्राचार्य सोनोपंत दांडेकर प्रभृतींचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला. त्यातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

सुरुवातीस त्यांनी काही काळ साताऱ्यात वकिली केली. पुढे त्यांनी मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे १९५७ ते १९८८ पर्यंत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. याच महाविद्यालयात १९६३ ते १९८८ असे सलग २५ वर्षे ते प्राचार्य होते. निवृत्तीनंतर १९८८ ते १९९१ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे (औरंगाबाद) ते कुलगुरू होते. ते तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व मानसशास्त्र हे विषय शिकवत. विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती होती. त्यांनी स्वामी विवेकानंद, श्री अरविंद, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा फुले, रवींद्रनाथ टागोर आदी थोर व्यक्तींच्या चरित्राचा अभ्यास केला, शिवाय महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर, स्वामी चक्रधरांपासून ते संत गाडगेबाबांपर्यंतच्या संतांचाही त्यांचा व्यासंग होता. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीनिमित्त (१९६३) महाराष्ट्रभर त्यांनी व्याख्याने दिली. त्या वेळेपासून अखेरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र तसेच गोवा, इंदूर, हैदराबाद (दक्षिण), बंगळूरू इत्यादी ठिकाणी त्यांनी असंख्य व्याख्याने दिली. पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत १९६९ ते १९९७ या काळात सतत अठ्ठावीस वर्षे व्याख्याने देण्याचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. आकाशवाणी व महाराष्ट्र राज्य माहिती खाते यांच्या विद्यमाने पु. न. लाड स्मृती व्याख्यानमालेतही दोन वेळा त्यांनी व्याख्याने दिली. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील मराठी साहित्य संमेलन आणि बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका यांच्या द्वैवार्षिक स्नेहसंमेलनासाठी अनुक्रमे १९९१ व १९९५ साली दोन वेळा अमेरिकेला भेटी दिल्या. त्या वेळी न्यू जर्सी, कॅलिफोर्निया, लॉस अँजेल्स, न्यूयॉर्क येथे त्यांनी व्याख्याने झाली. स्वामी समर्थांच्या पादुका नेणाऱ्या समितीसोबत ते १९९८ला सिंगापूरला गेले. त्या निमित्ताने त्यांनी रामदासांवर तिथेही व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानात थोर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंश असे, त्यांच्या विचाराचे विश्लेषण असे आणि त्यांच्या कार्याची–प्रबोधनाची मीमांसा असे. त्यांना अनेक मानसन्मान लाभले.

शिवाजीरावांच्या गंगौघासारख्या वक्तृत्वशैलीबद्दल डॉ. रघुनाथराव माशेलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, सेतुमाधवराव पगडी, पु. ल. देशपांडे प्रभृती मान्यवरांनी गौरव उद्गार काढले आहेत. त्यांचे विचार माणसामध्ये उच्च दर्जाची प्रेरणा निर्माण करतात. त्यांची वक्तृत्वशैली गंगा प्रवाहासारखी प्रसन्न व पवित्र भावना जागृत करणारी आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या सार्वत्रिक जीवनात स्वत:चे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पुणे : महाराष्ट्राला लाभलेला सह्याद्री वर्षाऋतूमध्ये पूर्णपणे निसर्ग सौंदर्याने नटून जातो. हे निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक विविध पर्यटनस्थळांना भेटी देतात तसेच काही ट्रेकर मंडळी वेगवेगळे ट्रेकही करतात, परंतु सह्याद्रीच्या दऱ्या–खोऱ्यांमध्ये भटकंती करत असताना काळजीही तितकीच घेतली पाहिजे.**

## आरोग्य प्रहर

# वजन कमी करण्यासाठी आहारात 'हे' पदार्थ खा!

वजन कसं वाढलं हे कुणालाच मसजत नाही, मात्र तेच वजन कमी करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला मोठी कसरत घ्यावी लागते. वेट लॉससाठी अनेक हेल्थ एक्सपर्ट कमी कॅलरीचे पदार्थ खाण्याचा सल्ला देतात. कॅलरी कमी असलेले पदार्थ खाल्ल्याने आपलं वजन वाढत नाही, शिवाय पोटही भरतं. त्यामुळे वजन कमी होण्यासाठी मदत होते. तुम्हीही आहारात अशा पदार्थांचा समावेश करू शकता. याने वजन झटपट कमी होतं.



काकाडी : वजन कमी करण्यासाठी तुम्ही आहारात काकडीचा समावेश करावा. यामध्ये जास्तप्रमाणात पाणी असते. काकडीचे सेवन केल्याने पोट लगेच भरते. काकडीमध्ये फायबरदेखील असते. त्यामुळे वर्कआउटसोबत आहारात काकडी असेल तर वजन भरपूर कमी होतं.

सफरचंद : आरोग्य तज्ञांच्या मते सफरचंदाचा उष्मांक फार कमी असतो. एक कप म्हणजे १०९ ग्रॅम सफरचंदमध्ये ६२ कॅलरीचा समावेश असतो. तर ३ ग्रॅम इतकं फायबर सुद्धा असतं. सफरचंदमध्ये पोटॅशिअम, व्हिटॅमीन असते. विविध जीवनसत्व असल्याने सफरचंद पोषक तत्वांचं मोठं भांडार आहे. या फळात तुम्हाला फ्लेव्हॉनॉइड, क्वेर्सेटीन आणि अँटीऑक्सिडंट्स सारखे पोषक तत्व मिळतात.

ब्रोकोली : ब्रोकोली पचण्यासाठी हलकी असते. शिवाय त्यातही उत्तम पोषकतत्व आहेत. एक कप ब्रोकोली खाल्ल्याने आपल्याला तब्बल ५४ कॅलरीज मिळतात. यात व्हिटॅमीन सी आणि अँटीऑक्सिडंट सारखे घटकसुद्धा असतात.

कोमट पाणी आणि मध : वजन कमी करण्यासाठी तुम्ही बरीच कसरत आणि मेहनत घेत असाल तर कोमट पाण्यात मध मिक्स करून प्या. मध आणि कोमट पाणी आपल्या शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करते. त्यामुळे शरीराला व्यायामासह या पाण्याची देखील वजन कमी करण्यासाठी मदत होते.

उकडलेलं अन्न : वजन कमी करताना कायम तेलकट पदार्थ खाणे टाळावे. तेलकट पदार्थ खाल्ल्याने वजन कमी होण्याऐवजी आणखी जास्त वाढते. त्यामुळे नाश्त्यासाठी दूध, उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य असे पदार्थ तुम्ही खाऊ शकता. तसेच यामध्ये विविध फळांचा समावेश करू शकता. त्याने भूक कमी लागते तसेच शरीराला योग्य प्रोटिन आणि फायबर सुद्धा मिळते.

**टीप : ही सामान्य माहिती आहे. तुम्ही वजन कमी करण्यासाठी आरोग्य तज्ञांचादेखील सल्ला घेऊ शकता.**

# रोह्यात मुसळधार पाऊस

## अष्टमी नाक्यावर पाणी; 'कुंडलिके'ने ओलांडली इशारा पातळी




नगर परिषदेचे कर्मचारी आणि पोलीस तैनात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात शनिवार रात्रभरापासून पाऊस पडत आहे. त्यामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. कुंडलिका नदी दुथडी भरून वाहून लागली आहे. अष्टमी नाक्यावर पाणी भरले असून नगर परिषदेचे कर्मचारी व पोलीस ठिकठिकाणी तैनात करण्यात आले आहेत.

कुंडलिका नदीत तुडुंब भरून वाहत असल्याने रोहा अष्टमीला जोडणारा जुना पूल काही काळ पाण्याखाली गेला होता. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून रोहा नगर परिषदेने हा पूल रहदारीसाठी दिवसभर बंद ठेवला होता. पुलाच्या दोन्ही बाजूला रोहा पोलीस व नगर परिषद कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

कुंडलिका नदीचे पाणी वाढू लागल्याने रोहा नगर परिषदेच्या वतीने सायरन वाजून सतर्कचा इशारा नदीकाठी असलेल्या घरांना देण्यात आले. कुंडलिका नदीच्या पात्रात पाणी वाढत असल्याने नागरिकांनी खबरदारी घ्यावी यासाठी शहरातून नगर परिषदेच्या वतीने रिक्षा फिरवण्यात आली होती. रोहा अष्टमीला जोडणारा जुना पूल बंद असल्याने संपूर्ण रहदारी नव्या पुलावरून चालू करण्यात आली होती.

गेले दोन दिवस रोहा शहराचा तालुक्यातील ग्रामीण भागात दमदार पाऊस पडला आहे. सर्वत्र पाणीच पाणी असे चित्र दिसत होते तर अधूनमधून वीजसेवा खंडित होताना दिसत होती.

# अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागडला सलग दोन दिवस पावसाने झोडपून काढले आहे. अंबा नदीने रविवारी (दि.१४) धोक्याची पातळी ओलांडली. परिणामी वाकण-पाली राज्य महामार्गावर अंबा नदी पुलाजवळ दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी भरले होते. यामुळे सकाळपासून येथील दोन्ही बाजूची वाहतूक तब्बल सहा तास ठप्प होती. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या, तसेच याच मार्गावर बलाप गावाजवळही रस्त्यावर पाणी साचल्याने तेथेही वाहतूक खोळंबली होती. दुपारी १ वा. नंतर पाणी ओसरल्यावर वाहतूक सुरू झाली.

पालीवरून वाकणकडे व वाकण वरून पालीकडे येणारी वाहतूक बंद झाली होती. रविवार असल्याने शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयांना सुट्टी असल्यामुळे विद्यार्थी व कर्मचारी या कोंडीतून सुटले, मात्र इतर नागरिकांचे हाल झाले. पाली-वाकण मार्गावरच बलाप गावाजवळ वळणावर मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले होते. या पाण्यातून काही वाहने धोकादायकपणे जात होती, मात्र छोटी वाहने अडकून पडली होती.

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. पाली व जांभूळपाडा अंबा नदी आणि भालगूल येथे मोठे पूल बांधण्यात आले, तसेच पाली अंबा नदीवरील एक पूल पूर्ण झाला आहे, तर दुसऱ्या पुलाचे काम सुरू आहे.

रस्ता रुंदीकरण व पुलामुळे पावसाळ्यात हा मार्ग सोयीचा होईल, अशी अपेक्षा होती, मात्र सर्वांचे हाल झाले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचून वाहतूक कोंडी झाल्यामुळे नागरिक हैराण झाले.




वाहतूक तब्बल सहा तास ठप्प

# महाडमध्ये पावसाची कोसळधार; नद्या दुथडी भरून वाहू लागल्या

**महाड : प्रतिनिधी**

गेले चार दिवसांपासून तालुक्यात पावसाचा जोर वाढला असून रविवारी सावित्री, गांधारी, काळ आणि नागेश्वरी नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. यामुळे नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. या पावसाच्या संतत धारेमुळे संपूर्ण जनजीवन पूर्णता विस्कळीत झाले आहे.



या मुसळधार पावसामुळे तालुक्यात पुराबरोबर दरडींचा धोका निर्माण झाला आहे. जिल्हा आणि महसूल प्रशासन ॲक्शन मोडवर ठेवण्यात आले आहे. शहराला संभाव्य पूराचा धोका लक्षात घेता एनडीआरएफची टिम सावित्री नदीवर लक्ष ठेवून आहे.


मागील ४८ तासांत महाड तालुक्यात २५० मिमी. पावसाची नोंद करण्यात आली असून आतापर्यंत एकूण १३०० मिमी. वार्षिक सरासरी मागील वर्षापेक्षा अधिक आहे. तिकडे रायगड मार्गाच्या कामामुळे लाडवली पुलाचा पर्यायी मार्ग तीन दिवस पुराच्या पाण्याखाली गेल्याने ही वाहतूक मोहप्रेमार्गे वळवण्यात आली आहे. पर्यायी मार्गावरदेखील डोंगरावरून पाणी आल्याने हा रस्तादेखील बंद होण्याची शक्यता आहे.

# कोर्लई रस्ता पूर्ववत करा

## आमदार महेंद्र दळवी यांचे प्रशासनाला निर्देश

**मुरूड : प्रतिनिधी**

मुंबई महामार्गाला जोडणाऱ्या कोर्लई येथील मुख्य रस्त्यालगत असणारी संरक्षक भिंत वाहून गेली असून रस्ता खचला आहे. त्यामुळे येथील वाहतूक व्यवस्था ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. याची दखल आमदार महेंद्र दळवी यांनी घेऊन तत्काळ रस्ता व्यवस्थित बनवण्याचे आदेश दिले आहेत.




शनिवारी एका दिवसात १०८ मिमी पाऊस बरसल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पावसाचा फटका कोर्लई येथील रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीला बसून ही भिंत वाहून गेल्याने रस्ता पोकळ बनला आहे. सध्या एका बाजूने येथील वाहतूक सुरू आहे, परंतु पाऊस थांबला नाही तर येथील वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे.

# मुसळधार पावसाने कर्जतकर चिंतेत

■ नदी उलटण्याच्या भीतीने रहिवाशांच्या उरात धडकी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात गेले दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसाने कर्जतकरांची झोप उडवली आहे. शहराच्या बाजूने वाहणारी उल्हास नदीचे पात्र कधीही उलटून पाणी घरात येईल की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे रहिवाशांच्या उरात धडकी भरली, मात्र पावसाने थोडी विश्रांती घेतल्याने नदीतील पाणी ओसरण्यास सुरुवात झाली.



गेले दोन दिवस सातत्याने पाऊस पडत असल्याने नदीकाठी राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. मागील अनुभव गृहीत धरता काही तळमजल्यावर राहणाऱ्यांनी नुकसान होऊ नये म्हणून सामानाची बांधाबांध सुरू केली. आपली वाहने हलवून सुरक्षित ठिकाणी ठेवली.

नदीचे पात्र उलटल्यानंतर पहिले कोतवाल नगरमध्ये पाणी शिरते. त्यानंतर विठ्ठल नगर, गुरू नगर, नानामास्तर नगर, मुद्रे बुद्रुकमधील महसूल वसाहत तसेच गुंडगेमधील काही भागात पाणी घरांमध्ये शिरते. रविवारी दुपारनंतर पावसाचा जोर कमी झाला. आमदार महेंद्र थोरवे यांनी नदी रुंद व स्वच्छ केल्याने नदीचे पात्र उलटत नाही.

# पाली-माणगाव मार्गावरील लव्हेलीवाडी येथील पूल खचला

**पाली : प्रतिनिधी**

पाली-माणगाव मार्गांवर रवाळजेजवळील लव्हेलीवाडी गावाजवळ असलेल्या कुंडलिका नदीवरील पुलाला एका ठिकाणी भगदाड पडले आहे, तसेच येथील रस्ता देखील खचला आहे. त्यामुळे येथून जाणाऱ्या वाहनांना व प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे या पुलावरील एका बाजूची वाहतूक बंद करण्यात आली आहे, तसेच येथे माहिती फलक लावले आहेत. सध्या मुंबई-गोवा महामार्गावर पुई येथील पुलाचे काम सुरू असल्यामुळे यामार्गे वाहतूक वळवण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरून रहदारी वाढली असून पुलावरील एकाच बाजूने रस्ता सुरू असल्याने वाहनांना अडथळा निर्माण होतो, तसेच पावसाळी पर्यटनासाठी अनेक पर्यटक येथून प्रवास करतात त्यांनादेखील अशावेळी अपघाताचा धोका संभवतो.

या पुलाचे रुंदीकरण करण्यात आलेले आहे, मात्र रुंदीकरण केल्यानंतरदेखील पुलाला भगदाड पडून रस्ता खचल्याने कामाच्या दर्जावर प्रश्न उपस्थित केला जात आहे.



**मागील काही दिवसांपासून ही स्थिती अशीच आहे. प्रवासी, पर्यटक व ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने याची लागलीच दखल घेऊन पुलाची दुरूस्ती करण्यात यावी व चांगल्या दर्जाचे काम केले जावे.**

**-आदेश दळवी,**
**माजी उपसरपंच, पाटणूस ग्रुपग्रामपंचायत**

# धुवांधार पावसाने खोपोलीत पाणीच पाणी!

## पाताळगंगा नदीला पूर; प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यासह खोपोली शहरात धुवांधार पावसामुळे शहराच्या अनेक सखल भागात पाणीच पाणी झाले. पाताळगंगा नदीला पूर आल्याने शेजारील गावांना त्याचप्रमाणे वाड्या वस्त्यांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला होता.



विशेषतः या पावसाचा खोपोली शहराला मोठ्या प्रमाणात फटका बसला. शहरातील उदय विहार, श्रीराम नगर, शिळफाटा, डीसी नगर, विणानगर, काटरंग या प्रमुख प्रभागामध्ये गुडघाभर पाणी असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. सावरोली पुलावर पाण्यातून वाहने काढताना चालताना कसरत करावी लागली. खोपोली शहरातून जाणाऱ्या मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर पाणी आल्याने प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना वाहन चालकांना करावा लागला.

वाहतूक कोंडीवर नियंत्रण करण्यासाठी अपघातग्रस्त मदत टीमला पोलिसांना पाचारण करावे लागले. रविवार असल्याने अनेकांना सुट्टी असल्याने ते घरीच होते. गुडघाभर पाण्यामुळे अनेकांच्या दुचाकी पाण्यात अडकल्या. मुंबई-पुणे महामार्गावर पाण्यातून जात असताना अनेक चारचाकी वाहनेसुद्धा बंद पडली. त्यांना अपघातग्रस्त मदत टीम व सामाजिक कार्यकर्त्यांनी मदत केली. दरम्यान खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी शहराच्या वेगवेगळ्या भागात जाऊन परिस्थितीची पाहणी करून त्याप्रमाणे अधिकाऱ्यांना सूचना केल्या. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. तत्काळ प्रशासनाला कल्पना द्यावी, असे आवाहन तहसीलदार आयुब तांबोळी यांनी नागरिकांना केले.



# माथेरानला जोरदार पावसाने झोडपले

● २१६ मिमी पावसाची नोंद; पर्यटकांची हजेरी

**नेरळ : प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने रविवारी सकाळपासून माथेरानला पावसाने झोडपले आहे. या पावसामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी घरांमध्ये झरे सुरू झाले आहेत. काही ठिकाणी झाडे पडली असून नेरळ-माथेरान घाटामध्ये दगड पडण्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.



माथेरानमधील दरडप्रवण भागांमध्ये स्थानिक प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. या गावांना सतर्क राहण्याचा इशारा नगरपालिका प्रशासनाने दिला आहे, तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश माथेरानचे मुख्याधिकारी तथा प्रशासन राहुल इंगळे यांनी दिले आहेत. मुसळधार पावसातदेखील पर्यटक दाखल झाले आहेत. शनिवारी रात्री जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला.

त्यामुळे अनेक ठिकाणी लहान मोठी झाडे पडली, तर माथेरान घाटामध्ये वॉटर पाईप रेल्वेस्टेशन पुढे दरड ही कोसळली. स्थानिक टॅक्सी संघटनेने तत्काळ या ठिकाणी जाऊन एकेरी वाहतूक सुरू केल्यामुळे पर्यटकांची गैरसोय टळली.

शनिवारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत माथेरानमध्ये ४८ मिमी. पावसाची नोंद झाली होती, परंतु रात्रीमध्ये तब्बल १६८ मिमी पाऊस झाला. रविवारी दिवसभर २१६ मिमी. पावसाची नोंद झाली.


# मोर्बे धरणातील पाणीपातळी वाढली

**चौक : प्रतिनिधी**

मोर्बे धरण परिसरात जोरदार पाऊस पडल्याने धरणातील पाणीसाठा वाढला असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेला पाणीपुरवठा सुरळीत राहील.

मोर्बे धरण खालापूर तालुक्यात असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. नवी मुंबई महानगरपालिका पूर्ण क्षेत्र आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे व खारघर विभागाला पाणीपुरवठा करते. गेले चार दिवस पावसाचे थैमान सुरू आहे. त्यामुळे मोर्बे धरणातील पाण्याचा संचय लवकर होत आहे. धरणातील पाण्याचा एकूण संचयन १९०.८९० एमसीएम एवढा आहे. म्हणजेच पूर्ण क्षमतेने धरण भरते.

या धरणात जलाशयाचा मृत साठा ५.५२० एमसीएम एवढा असतो. त्या वेळी धरण क्षमता २.८९ टक्के भरले असते. रविवारी ८०.०१८ एमसीएम एवढा संचय झाला आहे.



# पोलादपूर तालुक्यात संततधार

सावित्री नदी दुथडी भरून वाहू लागली




**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात शुक्रवारी दुपारपासून पावसाने संततधार सुरू केली आहे. गेल्या ७२ तासांमध्ये ३६३ मिमी. पावसाची नोंद झाल्याची माहिती पोलादपूर तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती निवारण कक्षाकडून देण्यात आली.

रविवारी दिवसादेखील पावसाने बरसणे कायम ठेवल्याने रात्रभर याच प्रमाणात पाऊस बरसल्यास पूरस्थिती उद्‌भवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. दरम्यान, पोलादपूर तालुक्यातील सर्व नद्यांची पात्रं तुडूंब दुथडी भरून वाहू लागली असून शेतामध्ये लावणीला हा पाऊस अनुकूल असल्याने शेतकऱ्यांनी आवणे रोवण्यासाठी कंबर कसली असल्याचे सार्वत्रिक दृश्य दिसून येत आहे.

शहरातील उत्तरवाहिनी सावित्री नदीचे पात्र सायंकाळी ५ वा.पर्यंत दुथडी भरून वाहात असल्याने पावसाचा जोर कायम राहिल्यास नदीपात्र लगतच्या लोकवस्तीवर्यंत विस्तारले जाऊन पूरस्थिती उदभवण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. नदीलगतच्या रस्त्यावरील घरे आणि दुकानदारांनी सामान सुरक्षितस्थळी हलविण्याची तयारी सुरू केल्याचे दिसून आले.

# निवडक



## आमदार मंदा म्हात्रेंचा जनता दरबार

**नवी मुंबई :** बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी आपल्या वाशी येथील जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार घेतला. या वेळी वाशी, तुर्भे विभागातील विविध सोसायटीमधील पदाधिकारी तसेच रिक्षा संघटना पदाधिकारी यांनी कामानिमित्त आमदार मंदा म्हात्रे यांची भेट घेतली. या जनता दरबार मध्ये बेलापूर मतदार संघातील अनेक मुस्लिम भगिनिंनी आमदार मंदा म्हात्रे यांच्या कार्याने प्रभावित होऊन भाजप पक्षात प्रवेश केला. दर शनिवारी सकाळी ११ ते २ यावेळेत वाशीतील कार्यालयात जनता दरबार घेणार असुन नागरीकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कट्टीबध्द असल्याचे आमदार म्हात्रे यांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम

**मोहोपाडा :** सेंट विन्सेंट पलौटी शाळेमध्ये गुरुवारी इन्वेस्टीचर सेरेमनी आयोजित केली गेली होती. यामध्ये पहिली ते दहावी वर्गापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यामध्ये शाळेय विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थी – उपप्रतिनिधी, पिवळा हाऊस, निळा हाऊस, लाल हाऊस, केशरी हाऊस प्रतिनिधी– उपप्रतिनिधी, खेळ सचिव, सांस्कृतिक सचिव, खजिनदार, शिस्त सचिव, सरचिटणीस, वर्ग प्रतिनिधी यांची निवडणूक केली गेली. रसायनी पोलीस इन्स्पेक्टर संजय बांगर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले होते. शाळेचे व्यवस्थापक फादर थॉमस मिरांडा, शाळेचे मुख्याध्यापक फादर जोएल वास व फादर सायमन लोबो यांनी पुष्पगुच्छ, शाल व शाळेचे स्मृतिचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात वेगवेगळे नाटक व नृत्य सादर केले.

## गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थी निवडणूक

**मोहोपाडा :** चौक येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलने अपेक्षित असलेल्या २०२४च्या विद्यार्थी निवडणुकांचे आयोजन केले होते. ज्यात स्कूल



कॅप्टन, व्हाईस स्कूल कॅप्टन, स्कूल स्पोर्ट्स कॅप्टन, व्हाईस स्कूल स्पोर्ट्स कॅप्टन, स्कूल डिसिप्लिन कॅप्टन, व्हाईस स्कूल डिसिप्लिन कॅप्टन, स्कूल कल्चरल कॅप्टन आणि व्हाईस स्कूल कल्चरल कॅप्टन या पदांसाठी निवड करण्यात आली. श्री स्वामिनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलसाठी एक गतिमान आणि फलदायी वर्ष पुढे आणण्याचे आश्वासन देत, नवीन दृष्टीकोन आणि उपक्रम आणण्यासाठी नवनिर्वाचित नेते तयार असताना, एका भव्य सभेत निकाल जाहीर करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी काढली वृक्षदिंडी



**नवी मुंबई :** नूतन मराठी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीमध्ये पारंपारिक वेशभूषा करून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. वृक्षदिंडी ढोल ताशांच्या गजरात सेक्टर १९ नेरूळमध्ये काढण्यात आली. वृक्षदिंडीनंतर शालेय मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले. कडुलिंब, चिकू, डाळिंब, पेरू, जांभूळ चिंच इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षदिंडीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कांबळे सर विद्यालयाचे शिक्षक वृंद निलेश सैद, सुनील पाटील, सुजाता मुंढे, लता औटी, जयवंत सुतार आणि राजू आदी उपस्थित होते.

## कामगारांनी दिला स्वच्छतेचा संदेश



**उरण :** भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीतील हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीचे जनरल मॅनेजर राजेंद्र टिकेकर यांच्या नेतृत्वाखाली कंपनीतील कामगारांनी स्वच्छ भारत अभियान सप्ताह अंतर्गत कंपनीच्या हेड ऑफिस ते द्रोणागिरी नोड वसाहत–द्रोणागिरी रेल्वे स्टेशन येथे शनिवारी (दि. १३) रॅलीचे आयोजन केले होते. या वेळी रॅलीत सहभाग घेतलेल्या अधिकारी व कामगारांनी उरण वासियांना स्वच्छतेच महत्त्व पटवून देत झाडे लावा पर्यावरण वाचविण्याचे आवाहन केले. या वेळी द्रोणागिरी रेल्वे स्टेशनचे व्यवस्थापक अधिकारी बळराम मिना यांनी अभियानात सहभाग घेतलेल्या हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कामगारांचे आभार मानले.

# स्वच्छताकार्याला प्रोत्साहन

## नवी मुंबईत विविध स्तरावर स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नवी मुंबई महापालिकेमार्फत लोकसहभागातून स्वच्छताविषयक उपक्रम राबविणे व या माध्यमातून नागरिकांच्या स्वच्छताविषयक वर्तणुकीमध्ये बदल घडविण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील नागरिकांना कचरा वर्गीकरण व ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया तसेच इतर स्वच्छताविषयक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देणे तसेच या बाबींमध्ये सातत्य ठेवून नागरिकांच्या सवयीत बदल घडविण्याच्या दृष्टीने नवी मुंबई शहरातील गृहनिर्माण संस्था, शाळा (खासगी व नवी मुंबई महापालिका), मार्केट असोसिएशन, हॉटेल्स, शासकीय कार्यालये व हॉस्पिटल या प्रमुख सहा गटांमध्ये स्वच्छता स्पर्धा आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेचे गुणांकन करण्याकरिता ठराविक निकष निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने निर्मितीच्या ठिकाणीच कचरा वर्गीकरण, कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचऱ्यावर प्रक्रिया करणे, शौचालय व्यवस्थापन, स्वच्छता विषयक पायाभूत सुविधा तसेच सध्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू असलेल्या सफाई अपनाओ बिमारी भगाओ या अभियानाच्या अनुषंगाने विविध आजारांचा प्रसार रोखण्याकरिता पावसाळी कालावधीमध्ये करण्यात आलेल्या नियमांचे पालन अशा विविध बाबींवर भर देण्यात आलेला आहे.

या स्वच्छता स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या गृहनिर्माण संस्था, शाळा (खासगी व नमुंमपा), मार्केट असोसिएशन, हॉटेल्स, शासकीय कार्यालये व हॉस्पिटल या संस्थांना ११ ते १९ जुलै २०२४ या कालावधीत संबंधित विभाग कार्यालयात अर्ज करता येणार आहेत. या स्पर्धेचे प्रत्यक्ष स्थळ परीक्षण व गुणांकन २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे. या स्वच्छता स्पर्धेमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित असून नागरिकांना प्रोत्साहन मिळावे याकरीता विभाग स्तरावरून निवड करण्यात आलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या स्वच्छ गृहनिर्माण संस्थांना अनुक्रमे २१ हजार रुपये, १५ हजार रुपये व ११ हजार रुपये रक्कमेची रोख बक्षिसे, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रासह प्रदान करण्यात येणार आहेत.

स्वच्छ शाळा स्पर्धेच्या खाजगी व नवी मुंबई महापालिका गटांतील प्रथम व व्दितीय विजेत्या शाळांना विभागीय स्तरावर अनुक्रमे १५ हजार रुपये व ११ हजार रुपये रोख बक्षिसे, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महापालिका स्तरावरील विजेत्या प्रथम, व्दितीय व तृतीय स्वच्छ गृहनिर्माण संस्थांना अनुक्रमे ५१ हजार रुपये, ४१ हजार रुपये व ३१ हजार रुपये रोख बक्षिसे, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. तसेच स्वच्छ शाळा स्पर्धेच्या (खासगी व नमुंमपा) गटांतील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या शाळांना अनुक्रमे २५ हजार रुपये, २१ हजार रुपये व ११ हजार रुपये रोख बक्षिस, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

स्वच्छ मार्केट स्पर्धेकरिता प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक विजेत्या मार्केट असोसिएशनला अनुक्रमे २५ हजार रुपये, २१ हजार रुपये व ११ हजार रुपये रोख बक्षिस, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे. स्वच्छ स्पर्धेतील हॉटेल, शासकीय कार्यालय आणि हॉस्पिटल या विभागातील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना विभाग स्तरावर तसेच मुख्यालय स्तरावर स्वतंत्रपणे सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. स्वच्छता ही दैनंदिन जीवनातील नियमित सवय व्हावी जेणेकरून शहर स्वच्छतेला बळकटी येईल या भूमिकेतून सोसायट्यांपासून ते पर्यटक मोठ्या संख्येने येतात अशा हॉटेलसारख्या व्यावसायिक संस्थांना स्वच्छतेच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्था अथवा शाळा, मार्केट असोसिएशन, हॉटेल्स, शासकीय कार्यालये व हॉस्पिटल या सहा गटांमध्ये स्वच्छता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

> **नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील संस्थांनी या स्वच्छता स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ नवी मुंबई मिशन यशस्वीपणे राबविण्यामध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.**
> **–डॉ. कैलास शिंदे,**
> **आयुक्त, नवी मुंबई पालिका**

# चारशेहून अधिक शौचालयांची सफाई




**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' हे अभियान नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अत्यंत प्रभावीपणे राबविण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्वच्छता उपक्रमांत लोकसहभागावर भर दिला जात आहे. या अंतर्गत 'सखोल स्वच्छता मोहीमा' राबविण्यात येत असून दैनंदिन स्वच्छता होत असते अशा जागांवर अधिक बारकाईने प्रभावीरित्या सखोल स्वच्छता करण्यावर भर दिला जात आहे.

अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम नमुंमपा क्षेत्रातील सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांमध्ये एकाचवेळी राबविण्यात आली. आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालय क्षेत्रातील ४०० हून अधिक सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमध्ये ही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यामध्ये विभागांचे विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डॉ.अमोल पालवे, सागर मोरे, भरत धांडे, सुनील काठोळे, संजय तायडे, अशोक अहिरे व उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड यांनी आपापल्या विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, अधिकारी – कर्मचारी, स्वच्छताकर्मींच्या सहयोगाने व स्थानिक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागातून शौचालयांची अंतर्गत स्वच्छता तसेच बाह्य परिसराची सखोल स्वच्छता केली. या विशेष सखोल स्वच्छता मोहीमेमुळे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचे बदललेले रूप बघून नागरिकांकडून प्रशंसा करण्यात आली.

# भारतीय मजदूर संघाच्या कामाने कामगारविश्व प्रभावित –सुधीर घरत

**उरण : बातमीदार**

भारतीय मजदूर संघाचे आजचे वैभव अनेकांच्या त्याग आणि बलदानामुळेच उभे आहे. जगातील कामगार विश्वातील अनेक जण भारतीय मजूर संघाच्या कामाने प्रभावित असून जगभरातील अनेक कामगार नेते भारतीय मजूर संघाचे मार्गदर्शन घेत आहेत. त्यांच्या देशात मार्गदर्शन करण्यासाठी संघाच्या पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करीत आहेत. ही अभिमानास्पद बाब आहे. हा गौरव, हा अभिमान आपल्याला प्राप्त झाला आहे. हे फक्त अनेक कार्यकर्त्यांचा त्याग आणि बलिदानामुळेच आहे, असे विचार कामगार नेते तथा भारतीय पोर्ट ॲण्ड डॉक मजदूर संघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी भारतीय पोर्ट ॲण्ड डॉक मजदूर महासंघाच्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्य कारिणीच्या बैठकीवेळी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.




बीएमएस की पहचान त्याग तपस्या और बलिदान या घोषवाक्य बद्दल विस्तृत मार्गदर्शन करताना अनेकांच्या त्याग व बलिदाना बद्दल सुधीर घरत यांनी माहिती दिली.

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघाचे दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारीणी सभा हलदीया पोर्ट, पश्चिम बंगाल येथे १३,१४ जुलै २०२४ रोजी झाली. या कार्यकारिणीच्या उद्घाटनावेळी पश्चिम बंगाल भारतीय मजदूर संघाचे प्रदेश अध्यक्ष प्रदीप कुमार बिजाली, जनरल सेक्रेटरी देवाशिष भट्टाचार्य, चंद्रकांत (अण्णा) धुमाळ, पोर्ट महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील,कोषाध्यक्ष सुधीर घरत, अध्यक्ष श्रीकांत राय व देशभरातील महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.या दोन दिवसीय कार्यकारणी मीटिंगमध्ये कामगारांच्या समस्यावर चर्चा करून भविष्यात येणारी आव्हाने काय असतील व त्यांना कसे सामोरे जायचे याबाबत रणनीती तयार करण्यात आली.

कामगार नेते तथा महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील यांनी भारतीय मजूर संघाला विविध बंदरात ठेकेदारी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांसाठी येणाऱ्या काळात जास्त काम करावे लागेल, असे मत व्यक्त केले.

# बेलापूर गाव आणि नोडमध्ये लोकोपयोगी उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

संदीप नाईक प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेच्या वतीने बेलापूर गाव आणि बेलापूर नोड या दोन ठिकाणी पहिल्या टप्प्यातील विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक त्यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, छत्री वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि शालोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले. 'आईच्या नावे एक झाड' अंतर्गत वृक्षारोपणदेखील करण्यात आले. शेकडो नागरिकांनी या उपक्रमांचा लाभ घेतला. सर्वांत जास्त शिक्षण संस्था असल्याने नवी मुंबई शहर शिक्षणाचे माहेरघर बनल्याचे जिल्हाध्यक्ष



नाईक या वेळी सांगितले.

नवी मुंबईतील विद्यार्थी गुणवंत असून या ठिकाणच्या शाळांमधील पटसंख्यादेखील वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपणाची गरज विशद करून जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जागतिक पर्यावरण दिनी सुरू झालेल्या 'एक पेड मा के नाम' अभियानात प्रत्येकाने आपल्या आईच्या नावे एक तरी झाड लावून ते जगवावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमांना महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेवक अशोक गुरखे, सामाजिक कार्यकर्ते विनीत पालकर, समाजसेवक अशोक नरबागे, बंद्रे, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री कातकरी यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, स्थानिक रहिवाशी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'कोकणातील महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय आयुक्त पी. वेलरासू यांनी कोकण विभागातील महिलांना राज्यातील महिलांच्या बळकटीकरणासाठी संपूर्ण राज्यभरात लागू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मोठया संख्येने लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

या योजनेची कोकण विभागात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, लाभार्थी महिलांची फरफट होऊ नये, यासाठी संबधित यंत्रणाना दक्षता घेण्यासोबतच विविध उपाययोजना करण्याचे आदेश आयुक्त पी.वेलरासू यांनी दिले आहेत.

कोकण विभागातील महिलांनी मोठ्या संख्येने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा आणि कोकण विभागाला राज्यात सर्वांत जास्त महिला लाभार्थींचा विभाग म्हणून अग्रेसर करावे, असे आवाहन कोकण विभागीय आयुकत पी.वेलरासू यांनी केले आहे.

# कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील केगाव येथे शुक्रवारी शासनाच्या UNDP-GCF प्रकल्पातून भारताच्या तटीय समुदायाची हवामान लवचीकता वाढविणे अंतर्गत भात पिक शेतीशाळा वर्ग क्रमांक–२ घेण्यात आला.

या वेळी प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जत येथील शास्त्रज्ञ नामदेव म्हसकर यांनी भात पीक रोपवाटिका, विविध प्रकारचे भात लागवड पद्धती व जमिनीमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध वाणांची माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ–नारनवर यांनी कृषी विभागाच्या योजना व भात पीक स्पर्धाबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले.

तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ व कृषी शास्त्रज्ञ श्री म्हसकर सर यांच्या हस्ते तूर वाटप करून कार्यक्रमाची सांगता केली. त्यावेळी ग्रामपंचायत सरपंच जगजिवन नाईक, कृषी पर्यवेक्षक अलका बुरकुल, कृषी सहायक ए. एस पानसरे तसेच मानकेश्वर नैसर्गिक शेतकरी गटातील शेतकरी उपस्थित होते.



# उरणमध्ये शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम पीक स्पर्धा

**उरण : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम पीक स्पर्धा राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर स्वतंत्रपणे आयोजित न करता एकाच वर्षात तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे आत्ता शेतकऱ्यांना तालुका पातळीबरोबर जिल्हा व राज्य पातळीवर सहभाग घेता येणार आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी शेतकऱ्यांनी तालुकास्तरावरील पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन, या शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेण्याचे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क सर्वसाधारण गटातील शेतकरी प्रवेश शुल्क रक्कम तीनशे रुपये आदिवासी गटातील शेतकरी प्रवेश शुल्क रक्कम१५० रुपये स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयकडे संपर्क साधावा असे आवाहन उरण कृषी अधिकारी यांनी केले आहे. अर्ज भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रे प्रवेश शुल्क भरण्याचे चलन, सातबारा व आठ अ चा उतारा जात प्रमाणपत्र (फक्त आदिवासी बांधव) बँक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्सप्रत अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२४ असून पीक स्पर्धा बक्षिसांचे स्वरूप स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात येणार आहेत.

तालुका पातळीवर अनुक्रमे पाच हजार रुपये, तीन हजार रुपये, दोन हजार रुपये, जिल्हा पातळीवर अनुक्रमे दहा हजार रुपये, सात हजार रुपये, पाच हजार रुपये तर राज्य पातळीवर अनुक्रमे ५० हजार, चाळीस हजार रुपये, तीस हजार रुपये असे बक्षिसांचे स्वरूप आहे. यामध्ये खरीप पिके भात, वरी, मका, नाचणी, तूर, उडीद, भुईमूग, सूर्यफूल या पिकांचा समावेश आहे.

# खारघरमधील पेठ गावात मध्यरात्री चोरांचा शिरकाव

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये ठिकठिकाणी मध्यरात्रीत घर फोडीचे किस्से समोर येत आहेत. त्यामुळे चोरट्यांनी खारघर पोलिसांसमोर आव्हान निर्माण केलं आहे. खारघर परिसरात गेल्या काही दिवसांमध्ये सेक्टर १२, सेक्टर १० अशा ठिकाणी बंद घराची कुलूप तोडून चोरी झाली असतानाची बातमी ताजी असतानाच आणखी एक चोरांचा थरारमय सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे.

खारघर पोलीस स्टेशनच्या हद्दीत काही दिवसापासूनच चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. काल रात्री दोन ते तीनच्या दरम्यान पेठगाव येथे पुन्हा एकदा घरफोडी करत चोरट्यांनी बंद घरांना आपल्या निशाणावर ठेवला आहे. चोरट्यांचा हा थरार सीसीटीव्हीत कैद झाला असल्याचे दिसत आहे. अमोल पाटील यांच्या इमारतीतील एका भाडेकरूच्या बंद घराचे कुलूप तोडून आठ ते नऊ हजार चोरी झाली असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

अजय शेळके यांची बंद घराचे कुलूप तोडले असून झंकार ब्रास बँड ऑफिसचे कुलूप तोडला असल्याचे समोर आले आहे. चार ते पाच जणांच्या चोरांच्या टोळीमुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. या चोरांचा बंदोबस्त करावा आणि त्यांना अटक करावी, अशी मागणी येथे रहिवासी करत आहेत.

निवडक

## रेवदंडा येथे वृक्षारोपण कार्यक्रम



**रेवदंडा** : समुद्रकिनारी नव्यानेच उभारलेल्या जीम परिसरात रेवदंडा ग्रामपंचायतीच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच मंदा बळी, ग्रामपंचायत सदस्य दुशांत झावरे, प्रसाद गोंधळी, हर्षल घरत, भारती मोरे, धनजंय कोंडे, कर्मचारी सुभाष मानकर, सचिन मयेकर, शहानु शानवाज, रवी देवकर, विजय बांदिवडेकर, गौरी मोरे आदी उपस्थित होते. रेवदंडा ग्रामपंचायतीच्या वतीने एकूण २०० वृक्ष रोपट्यांची लागवड करण्यात आली.

## मोबाईल हेल्थ केअर युनिटचे उद्घाटन



**मुरूड** : अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लि. च्या माध्यमातून ग्रामपंचायत दिघी येथे मोबाईल हेल्थ केअर युनिट उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे दिघी ग्रामपंचायतीचे सरपंच विपुल गोरिवले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नारायणकर, हेल्पेज इंडिया डायरेक्टर राजेश्वरी चौधरी, दिघी पोर्ट लिमिटेडकडून कॅप्टन राघवेंद्र राघव मरीन हेड, कर्नल चंदर देव संब्याळ, मानव संसाधन विभाग प्रमुख संदीप कदम, कोळी समाज अध्यक्ष किरण कांदेकर, मुस्लिम समाज उपाध्यक्ष सलील अंतुले, बौद्ध समाज अध्यक्ष राजेश कासारे, अदानी फाउंडेशन डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे, अवधूत पाटील उपस्थित होते.

## पालकमंत्री उदय सामंत जिल्हा दौऱ्यावर

**रायगड** : उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत हे मंगळवारी (दि.१६) रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा सोमवारी (दि.१५) सायंकाळी ६ वा. खेड येथून मोटारीने अलिबागकडे प्रयाण, रात्रौ ९ वा. शासकीय विश्रामगृह, अलिबाग येथे आगमन व राखीव, मंगळवारी सकाळी ११ वा. रायगड जिल्हा नियोजन समितीची बैठक, दुपारी १ वा. रायगड जिल्हा डोंगरी विभाग विकास समिती बैठक, दुपारी २ वा. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना रायगड जिल्हा शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती, सायंकाळी ६ वा. अलिबाग येथून मुंबईकडे प्रयाण असा असणार आहे.

# रायगड जिल्ह्यात दमदार पाऊस

## ▪१९ धरणे १०० टक्के भरली; पाणीटंचाई होणार दूर

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जुलैच्या सुरुवातीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश धरणे १०० टक्के भरली आहेत. त्यामुळे नागरिकांची पाणीटंचाईच्या समस्येतून सुटका झाली आहे.

जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १९ धरणे १०० टक्के भरले आहेत. चार धरणात मात्र ५० टक्केपेक्षा कमी पाणीसाठा आहे, तर उर्वरित पाच धरणे ही १०० टक्के भरण्याच्या दिशेने आहेत. १९ धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

मुरूड तालुक्यातील फणसाड धरण १०० टक्के, तळा तालुक्यातील वावा धरण १०० टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणात १०० टक्के, पेण तालुक्यातील आंबेघर धरणात १०० टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगांव धरणात २८ टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणात १०० टक्के, घोटवडे धरणात १०० टक्के, ढोकशेत धरणात ८९ टक्के, कवेळे धरणक्षेत्रात १०० टक्के, उन्हेरे धरणक्षेत्रात १०० टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ६३ टक्के, कुडकी धरणात १०० टक्के, जिल्ह्यातील सर्वांत कमी साठा रानिवली धरणात १९ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणात १०० टक्के, संदेरी धरणात १०० टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरणात १०० टक्के, खिंडवाडी धरणात १०० टक्के, कोर्थुडे धरणात १०० टक्के, खैरे धरणात १०० टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरणात २६ टक्के, अवसरे धरणात ३१ टक्के, खालापूर तालुक्यातील भिलवली धरणात १०० टक्के, कलोते मोकाशी धरणात १०० टक्के, डोणवत धरणात १०० टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणात १०० टक्के, बामणोली धरणात ८८ टक्के, उसरण धरणात ९८ टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे धरणात ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.



## भिवपुरी स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे भरले

**कर्जत : प्रतिनिधी**

डिकसळ भागातून भिवपुरी रोड रेल्वेस्थानकाकडे जाण्यासाठी असलेला रस्ता चिखलात हरवला होता. याबाबत स्थानिक उमरोली ग्रामपंचायतीच्या सदस्य भारती पाटील यांनी पुढाकार घेतला आणि त्यानंतर ग्रामपंचायतीने माती बाजूला करून त्यावर खडी टाकून रस्ता सुस्थितीत करण्याचे काम केले आहे.

कर्जत-मुंबई मध्य रेल्वेमार्गावरील भिवपुरी रोड स्थानकात पोहचण्यासाठी असलेला रस्ता खराब झाला होता. प्रवाशांना रस्त्यातून वाट काढताना त्रास होत असल्याने स्थानिक सदस्य भारती विजय पाटील यांच्या प्रयत्नातून उमरोली ग्रामपंचायतीकडून या रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली.



भिवपुरी रोड स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याची मागणी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे तसेच कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे वारंवार भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना मागणी करीत असताना रस्त्याचे काम आमदार निधीतून मंजूर करण्यात आले आहे, पण पावसाळा सुरू झाल्यानंतरचे पडलेले खड्डे व प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेने उमरोली ग्रामपंचायतीला रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती.

उमरोली ग्रामपंचायतीकडून खड्डे भरण्यास सुरुवात केली आहे. त्याबद्दल रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड, सदस्य रवींद्र राऊत, विजय पाटील, प्रवीण ठाकरे, शंकर बुधांटे, रिक्षा स्टँडचे अध्यक्ष हरेश्वर घारे, गणेश लोंगले, परेश लोंगले, रणजीत ठाणगे, चंद्रकांत लोंगले, किशोर गायकर, अमर गायकर संदीप गायकर, महेश ऐनकर, लहू घारे, पंकज म्हसे आदींनी समाधान व्यक्त केले आहे.

## खोपोली, खालापुरात धुवांधार पाऊस

### सावरोली मार्गावरील पूल गेला पाण्याखाली

**खालापूर : प्रतिनिधी**

मागील दोन दिवस धो धो पडणाऱ्या पावसाने खोपोली, खालापूर, रसायनी, वावोशी भागातील सखल भागात पाणी साचले आहे, तर खोपोलीतील लौजी भागात रहिवाशी क्षेत्रात पाणी साचल्याने रहिवाशांना सतर्क राहण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. खोपोलीतून उगम पावणारी पाताळगंगा नदी धोक्याच्या पातळीवर पोहचली आहे. पाताळगंगा नदीवर असणाऱ्या खालापूर सावरोली मार्गावरील पूल पाण्याखाली गेल्याने येथील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

चौक-कर्जत मार्गावरील वावर्ले गावच्या हद्दीत पाणी साठल्याने हा मार्ग काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता, तसेच केळवली रेल्वेस्टेशन परिसरात पाणी साठल्याचे चित्र होते, परंतु रेल्वे वाहतूक व्यवस्थेवर याचा काहीही परिणाम झाला नाही. खोपोली-पाली मार्गावर पाणी साचले असल्याने वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला होता.







**माणगाव : रायगड जिल्ह्यातून निसर्गाचा आस्वाद घेत पुण्याला जाताना रम्य ताम्हिणी घाट लागतो. या घाटात पावसामुळे डोंगरातून अनेक धबधबे प्रवाहित होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्याही वाढली आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## रूळ ओलांडणाऱ्या प्रवाशांना रेल्वे पोलिसांनी दिली समज

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे मेन लाईनवरील भिवपुरी रोड रेल्वेस्थानकात प्रवासी रूळ ओलांडून जात असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. असे रूळ ओलांडून जाणाऱ्या अनेक प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे रेल्वे राखीव दलाकडून असा रूळ ओलांडून जाणाऱ्या प्रवाशांना एकत्र करून त्यांना समज देण्यात आली.

कर्जत येथील रेल्वे राखीव दलाकडून भिवपुरी रोड रेल्वेस्थानकात कारवाई करण्यात आली. या वेळी उपनिरीक्षक प्रसाद चौगुले आणि स्थानक प्रबंधक शिवपुरी आहेर यांनी, रूळ ओलांडून जाणाऱ्या प्रवाशांना एकत्र करून त्यांना रूळ ओलांडून जाणे किती धोकादायक आहे, याबद्दल माहिती दिली, तसेच काही प्रवाशांवर करावाईदेखील करण्यात आली. उपनिरीक्षक प्रसाद चौगुले यांनी सर्व प्रवाशांना रेल्वेनियमदेखील सांगितले.



## हाळ खुर्द गावातील कचरा महामार्गावर; घंटागाडीला ग्रामस्थांकडून ठेंगा

**खोपोली : प्रतिनिधी**

स्वच्छता अभियानाची सर्वत्र प्रभावीपणे जनजागृती सुरू असूनही हाळ खुर्द ग्रामपंचायत हद्दीत मात्र विपरीत परिस्थिती आहे. ओला व सुका कचरा मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर राजरोसपणे टाकण्यात येत आहे.

हाळ खुर्द ग्रामपंचायत सधन असल्याने कचरा संकलनासाठी घंटागाडी सोय करण्यात आली आहे, परंतु स्वच्छतेचे वावडे असलेले काही कुटुंब दररोज कचरा रस्त्यावर टाकत आहेत. मोठ्या प्रमाणात जमा झालेला कचरा महामार्गावर येत असून पावसामुळे कुजलेल्या कचऱ्याची प्रचंड दुर्गंधी सुटत आहे. शिवाय हा कचरा खाण्यासाठी गुरे कळपाने येत असून श्वानदेखील घुटमळत असल्याने महामार्गावरून चालकांना अपघाताची भीती सतत असते.

यासाठी नियम न पाळणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची मागणी होत आहे.



**घंटागाडी दररोज गावात फिरत असतानादेखील काही जण जाणीवपूर्वक कचरा रस्त्यावर टाकत आहे. काही दिवसांपूर्वी या ठिकाणी जेसीबी लावून साफसफाई केली होती, परंतु पुन्हा कचरा जमा झाला आहे. ग्रामपंचायतीकडून प्रत्येक घरी ओला व सुका कचरा जमा करण्यासाठी डस्टबिन देण्यात येतील. कचरा टाकण्यात येत असलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येऊन कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.**

**-अजीम मांडलेकर, उपसरपंच, हाळ खुर्द ग्रामपंचायत**

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेतर्फे २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदविका उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासद पाल्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी (दि.१३) चेअरमन आनंद यादव तसेच संचालक दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, दीप्ती मोरे यांच्या हस्ते उत्साहात झाला.



चेअरमन आनंद यादव यांनी, विद्यार्थी व पालकांचे स्वागत करून संस्थेच्या प्रगतीचा आलेख उपस्थित सर्वांसमोर ठेवीत यापुढे दरवर्षी आपण विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाल्यास एका प्रशस्त हॉलमध्ये गुणगौरव सोहळा कार्यक्रम घेऊ, असे सांगत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे शुभेच्छा दिल्या.

या वेळी पतसंस्थेतर्फे श्रावणी प्रफुल्ल गवळी (दहावी), नहुष संतोष भोनकर (दहावी), दिव्या दत्ताराम दिवेकर (दहावी), सायली दिलीप मोरे (दहावी), वेदांत दिनेश केकाणे (दहावी), आनम सलीम शेख (दहावी), सादीक अल्लाबक्ष यतीनमणी (दहावी), संस्कार रामा पालकर (दहावी), ओम रुपेश पारकर (दहावी), तन्वी संजय गुगळे (दहावी), रुची उमेश तळकर (दहावी), अवधूत गजानन जाधव (दहावी), सार्थक निलेश भोसले (दहावी), नीलम नवनाथ गावडे (दहावी), मधुरा मनोज अहिरे (दहावी), ओमकार अंकुश उंडरे (दहावी), सिदरा उरफान परदेशी (दहावी), पार्थ संजोग शेट (बारावी), मयूरी मनोज मिरजकर (बारावी), प्राची प्रभाकर मसुरे (बारावी), श्रेयश निरंजन कळस (बारावी), हर्ष जयवंत जाधव (बारावी), अनन्या शैलेश बामणे (बारावी), प्रणाली अंकुश उंडरे (बारावी), तेजस मोहन गोसावी (एम.फार्म), कृपाली जयवंत जाधव (पदवी), प्राची सुरेश वाढवळ (पदवी), चैतन्य गिरीश देशमुख (पदवी), डॉ. कुणाल प्रफुल्ल गवळी (पदवी) आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा आकर्षक सन्मानचिन्ह, रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. संस्थेचे संचालक दिलीप जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. शनिवारी (दि.१३) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १०० वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ९० हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## चौक-कर्जत राज्य महामार्ग पाण्याखाली

**चौक : प्रतिनिधी**

चौक-कर्जत या मार्गावर पावसाचे पाणी साचल्याने वाहतुकीला त्रास होत असून, पादचारी यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. चालकांना पाण्यातून चाचपडत प्रवास करावा लागला.

चौक परिसरात गेले चार दिवस पावसाचे थैमान सुरू आहे. त्यामुळे नदी नाले हे दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे या परिसरात पाण्याचे साम्राज्य पसरले आहे. खालापूर तालुक्यातील जव्हार-वाडा-मुरबाड-कर्जत-चौक-लोहोप या राज्यमार्गाची सुधारणा करण्याचे काम सुरू आहे.

याचाच एक भाग चौक ते कर्जत राज्य मार्गाचेदेखील काम सुरू आहे. हा रस्ता रूंदीकरण करताना रस्त्यावरील मोऱ्या, छोटे पूल याचा विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे पाण्याच्या निचरा होण्यासाठी गटार व्यवस्था नाही. रात्री या मार्गाने गाडी चालविणे अथवा प्रवास करणे खूप जिकरीचे आहे, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.



हा रस्ता करण्यापूर्वी रस्ता रुंदीकरण करताना साईटपट्टी, पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार आणि रस्त्यासाठी जागा संपादन करणे गरजेचे होते, असे माजी सरपंच प्रफ्फुल विचारे यांनी सांगितले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे.

### वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स लीग

# पाकिस्तानला हरवून भारतीय संघ विजेता

**लंडन : वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने वेस्ट इंडिजच्या धरतीवर ऐतिहासिक कामगिरी करताना ट्वेंटी-२० विश्वचषक उंचावला. तब्बल ११ वर्षांनंतर आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात टीम इंडियाला यश आले अन् तमाम भारतीयांना जल्लोष करण्याची संधी मिळाली. अशातच भारताच्या दिग्गज खेळाडूंनी आणखी एक ट्रॉफी आपल्या घरी आणली. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स लीगच्या अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर मात केले आणि विजेतेपद पटकाविले.



इंग्लंडमध्ये झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने शानदार विजय मिळवला. यासह युनूस खानच्या नेतृत्वातील पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला. भारत सिक्सर किंग युवराज सिंगच्या नेतृत्वात होता. इंडिया चॅम्पियन्सकडून अंबाती रायुडूने अंतिम सामन्यात सर्वाधिक खेळी केली. त्याने दोन षटकार आणि पाच चौकारांच्या मदतीने ३० चेंडूत ५० धावा कुटल्या. या खेळीमुळे त्याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानला म्हणावी तशी कामगिरी करता आली नाही. त्यांनी निर्धारित २० षटकांत ६ बाद १५६ धावा केल्या. भारताकडून अनुरीत सिंगने सर्वाधिक तीन बळी घेतले. पाकिस्तानने दिलेल्या १५७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाने १९.१ षटकांत ५ बाद १५९ धावा करून चॅम्पियन होण्याचा मान पटकावला.

पाकिस्तानने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना इंडिया चॅम्पियन्सची सुरुवात चांगली झाली. रॉबिन उथप्पा आणि अंबाती रायुडू यांनी पहिल्या गड्यासाठी ३४ धावांची भागीदारी केली, जी तिसऱ्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर संपली तेव्हा उथप्पा आठ चेंडूत एक चौकाराच्या मदतीने १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर त्याच षटकातील शेवटच्या चेंडूवर सुरेश रैना केवळ चार धावा करून बाद झाला. यानंतर रायुडू आणि गुरकीरत सिंग मान यांनी काही काळ डाव सावरला. बाराव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर अंबाती रायुडूच्या रूपाने इंडिया चॅम्पियन्सला तिसरा धक्का बसला.

अखेर कर्णधार युवराज सिंगने नाबाद १५ आणि इरफान पठाणने नाबाद पाच धावांची खेळी केली आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. इरफानने विजयी चौकार लगावताच चाहत्यांनी एकच जल्लोष केला.

# भारताच्या श्रीलंका दौऱ्याचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वे दौऱ्यानंतर भारतीय संघ श्रीलंकेचा दौरा करणार आहे. तेथे टीम इंडिया तीन सामन्यांची टी-२० मालिका आणि तितक्याच सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे. यासाठी भारतीय संघाची लवकरच घोषणा होऊ शकते. या दौऱ्यात हार्दिक पांड्याकडे टी-२० आणि केएल राहुलकडे एकदिवसीय संघाचे कर्णधारपद सोपवले जाऊ शकते, असे बोलले जात आहे. तत्पूर्वी या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) या दौऱ्याचे वेळापत्रक आधीच जाहीर केले होते, मात्र त्यात आता बदल करण्यात आला आहे.

नव्या वेळापत्रकानुसार आता २७ जुलैपासून टी-२० मालिका सुरू होणार आहे. यापूर्वी २६ जुलैला म्हणजे एक दिवस आधी टी-२० मालिकेला सुरुवात होणार होती, पण आता २७ जुलैपासून सुरुवात होईल. दुसरा सामना २८ जुलैऐवजी २९ जुलै आणि तिसरा सामना २९ जुलैऐवजी ३० जुलैला खेळवला जाईल. टी-२० मालिकेतील सर्व सामने पल्लेकेले येथील स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत.

याचबरोबर वनडे मालिकेचे वेळापत्रकही बदलण्यात आले आहे. आता एकदिवसीय मालिका २ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. दुसरा सामना ४ ऑगस्टला, तर तिसरा सामना ७ ऑगस्टला होणार आहे. एकदिवसीय मालिकेतील सर्व सामने कोलंबोमध्ये खेळवले जातील. सुरुवातीला १ ऑगस्टपासून वनडे मालिका सुरू होणार होती. दुसरा सामना ४ ऑगस्टला आणि तिसरा सामना ७ ऑगस्टला होणार होता, मात्र आता त्यात बदल करण्यात आला आहे.

टी-२० मालिकेचे सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता आणि एकदिवसीय मालिकेचे सामने दुपारी २.३० वाजता खेळवले जातील. मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरचा हा पहिलाच दौरा असणार आहे.

## रिकी पॉंटिंगचा दिल्ली कॅपिटल्स संघाला अलविदा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमधील दिल्ली कॅपिटल्सच्या खराब कामगिरीनंतर मुख्य प्रशिक्षकपदाचा रिकी पॉंटिंगने राजीनामा दिला आहे. याबाबत दिल्ली कॅपिटल फ्रँचायझीने एक्सवर पोस्ट शेअर करून माहिती दिली.

ऑस्ट्रेलियन दिग्गज पॉंटिंग गेल्या सात वर्षांपासून संघाचा भाग होता. त्याच्या प्रशिक्षणात दिल्लीच्या अनेक युवा खेळाडूंचा खेळ सुधारला, तर दिल्लीने २०२२मध्ये अंतिम फेरी गाठली होती, मात्र २०१८पासून ते आतापर्यंत असा दीर्घ कार्यकाळ असूनही पॉंटिंग संघाला जेतेपद मिळवून देऊ शकला नाही. आयपीएलच्या नुकत्याच संपलेल्या १७व्या हंगामात दिल्ली कॅपिटल्सला प्लेऑफ्समध्ये पोहचता आले नव्हते. संघ गुणतालिकेत सहाव्या क्रमांकावर राहिला.

रिकी पॉंटिंगच्या राजीनाम्यानंतर दिल्ली कॅपिटल्सने एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यात आठवणींना उजाळा दिला आहे.

## राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेची गटवारी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर पश्चिम विरुद्ध औरंगाबाद, परभणी विरुद्ध पिंपरी चिंचवड या पुरुषांच्या सामन्याने ७१व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होईल. बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे, बाणेर येथे १५ ते २० जुलै या कालावधीत पुरुष व महिला गटाच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



मॅटच्या पाच क्रीडांगणावर पुरुषांचे सामने खेळविण्यात येतील. राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांच्या हस्ते १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. या स्पर्धेची गटवारी राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी एका पत्रकाद्वारे सर्व प्रसारमाध्यमांना कळविली आहे.

**अशी आहे गटवारी**

पुरुष विभाग : अ गट- मुंबई शहर पश्चिम, पालघर, औरंगाबाद; ब गट : अहमदनगर, रायगड, सोलापूर, ठाणे; क गट : मुंबई उपनगर पूर्व, परभणी, उस्मानाबाद, पिंपरी चिंचवड; ड गट : नांदेड, लातूर, बीड, पुणे शहर; इ गट : रत्नागिरी, नंदुरबार, जळगाव, नाशिक; फ गट : धुळे, ठाणे ग्रामीण, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर पश्चिम; ग गट : नाशिक शहर, पुणे ग्रामीण, हिंगोली, मुंबई शहर पूर्व; ह गट : सांगली, कोल्हापूर, सातारा, जालना.





**सोलापूर : आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या पालख्या आता अंतिम टप्प्याकडे कूच करीत आहेत. ऊन, वारा, पाऊस अशी कशाचीही तमा न बाळगता वारकरी मजल दर मजल करीत पायी मार्गक्रमण करीत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी माळशिरस येथे आल्यावर रिंगण सोहळा झाला. त्याचबरोबर वारकऱ्यांनी एकत्र येत नादब्रम्हची अनुभूती दिली. हा सोहळा अनुपम होता.**
(छाया : सुधीर नाझरे)


वाढदिवसाचे अभिष्टचिंतन...

पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका
सौ. सुशीला घरत
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
भाजपा
सौजन्य : सौ. चारुशीला घरत (माजी उपमहापौर, पनवेल मनपा)

जीवेत् शरदः शतम्!
सत्यविजय पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
चंद्रकांत म्हात्रे

जीवेत् शरदः शतम्!
अमित अकिवते
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
संतोष कडू

जीवेत् शरदः शतम्!
प्रमोद पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
रामनाथ पाटील

जीवेत् शरदः शतम्!
रामप्रसाद पासी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
राजेश पाटील

।। श्री गजानन प्रसन्न ।। स्थापना : २६ जानेवारी २००४

**अस्मिता कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व प्रियदर्शनी महिला मंडळ, नवीन पनवेल**

अस्मिता कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ व प्रियदर्शनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने **सोमवार, दि.१५.०७.२०१४** रोजी **सौ. सुशिला जगदिश घरत (माजी नगरसेविका तथा सभापती- पनवेल महानगरपालिका) यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थाचा गुण गौरव व जेष्ठ नागरीकांचा छत्री वाटप समारंभ संध्याकाळी ५.०० वाजता मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अध्यक्षते खाली व श्री. वाय. टी. देशमुख (जेष्ठ नेते भाजप) यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.** तरी आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे, ही नम्र विनंती.

**प्रमुख उपस्थिती**
मा. श्री. प्रशांतदादा ठाकूर (आमदार)

◆ प्रमुख पाहुणे ◆

**मा. श्री. अरुणशेठ भगत** (पनवेल भाजपा ता. अध्यक्ष)
**श्री. अनिल भगत** (पनवेल शहर अध्यक्ष)
**श्री. नितीन पाटील** (माजी नगरसेवक)
**श्री.संतोष शेट्टी** (माजी नगरसेवक)
**सौ. चारुशिला घरत** (माजी नगरसेविका)
**श्री. प्रकाश बिनेदार** (माजी नगरसेवक)
**श्री. सुनील घरत** (माजी नगराध्यक्ष)
**श्री. जयंत पगडे** (पनवेल शहर अध्यक्ष)
**श्री. समीर ठाकूर** (माजी नगरसेवक)
**सौ. वर्षा रविंद्र नाईक** (माजी नगरसेविका)
**श्री. सी.सी. भगत** (भाजप नेते)
**मा. श्री. परेश ठाकूर साहेब** (माजी सभागृह नेता पनवेल महानगरपालिका)
**सौ. कविता चौतमल** (माजी महापौर पमपा)
**सौ. रत्नप्रभा घरत** (पं. स. सदस्या)
**श्री. मनोज भुजबळ** (माजी नगरसेवक)
**श्री. संदिप पाटील** (माजी नगराध्यक्ष)
**श्री. तेजस कांडपिळे** (माजी नगरसेवक)
**सौ. राजेश्री वावेकर** (माजी नगरसेविका)
**सौ. वृषाली वाघमारे** (माजी नगरसेविका)
**सौ. स्मीता वाणी** (माजी नगराध्यक्षा)
**श्री. विजय म्हात्रे** (अध्यक्ष प्रभाग १७)
**श्री. के. डी. म्हात्रे** (माजी नगरसेवक)

सर्व बुथ अध्यक्ष व शक्तिकेंद्र प्रमुख यांनी उपस्थित रहावे हि नम्र विनंती.
ठिकाण : सि.के.टी. हायस्कूल, सेक्टर १४, नविन पनवेल

आपले नम्र
**डॉ. कु. अस्मिता जगदिश घरत** (अध्यक्षा-पनवेल वैद्यकीय सेल)
**(अस्मिता कला, क्रिडा व सांस्कृतिक मित्र मंडळ )**

| कार्यक्रमाचे नाव | वेळ |
|---|---|
| १. ज्येष्ठ नागरिकांचा छत्री वाटप समारंभ | संध्या. ५.०० वा. |
| २. १० वी विद्यार्थ्यांचा सत्कार (७५% व पेक्षा जास्त गुण) | संध्या. ५.०० वा. |
| ३. १२ वी विद्यार्थ्यांचा सत्कार (६५% व पेक्षा जास्त गुण) | संध्या. ५.०० वा. |

संपर्क
**श्री. शिवनाथ पन्हाळे** : ९८१९९२५६५२
**श्री. प्रफुल्ल पवार** : ९८१९९८२४३६
**श्री. संदिप पाटील** : ९७६९४०९१४८
**श्री. राजू बोराडे** : ९८२०६४६७६८

**श्री. परशुराम ठकेकर** सल्लागार
**श्री. सचिन पाटील** कार्याध्यक्ष
**श्री. अमेश तारेकर** अध्यक्ष
**श्री. नानचंद भोपी** उपाध्यक्ष
**श्री. राहूल मालोतकर** खजिनदार
**श्री. संदिप ना. पाटील** उपाध्यक्ष
**श्री. शेखर करमरकर** सचिव

जनसंपर्क कार्यालय
ई-१/०९/सी-२, सेक्टर १४, नवीन पनवेल


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com